शुक्रवार, 21 ऑक्टोबर 2022
किंमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - 02 अंक -75
Title Code : MAHMAR51117

# आधुनिक केसरी


● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● FRIDAY 21 OCTOBER 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-75 ● TITLE CODE : MAHMAR51117 ● PAGE-12 ● PRICE-5

## सुशिक्षित बेरोजगारांची 'दिवाळी'

### केंद्रासह राज्य सरकारही करणार मेगा भरती

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : मोदी सरकारकडून दिवाळीचे सर्वात मोठे गिफ्ट, तब्बल 75 हजार तरुणांना मिळणार सरकारी नोकरीचं ऑफर लेटर धनत्रयोदशीच्या दिवशी मोदी सरकारकडून 75 हजार जणांना सरकारी नोकरीचे नियुक्ती प्रमाणपत्र देण्यात येईल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते 22 ऑक्टोबर रोजी रोजगार मेळाव्याचे आयोजने केले आहे. यामध्ये 10 लाख जणांना रोजगार देण्यासाठी या मेळाव्याचं आयोजन करण्यात आले आहे.**



रोजगार मेळाव्याच्या पहिल्या टप्प्यात 75 हजार लोकांची भरती केली जाणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ऑनलाईन या मेळाव्याचं शुभारंभ होणार आहे. या समारंभात, 75 हजार नवनियुक्त कर्मचाऱ्यांना नियुक्ती पत्रे देण्यात येतील. यावेळी पंतप्रधान नवनियुक्त कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. पंतप्रधान मोदी यांच्या निर्देशांनुसार, सर्व मंत्रालये आणि विभागांमध्ये असलेल्या मंजुरीप्राप्त रिक्त जागा भरण्याचे काम मिशन मोडवर सुरु झाले आहे. देशभरातून निवडले गेलेले नवनियुक्त कर्मचारी, केंद्र सरकारच्या 38 मंत्रालये आणि विविध विभागांमध्ये कामावर रुजु होतील. यात अ श्रेणी, ब श्रेणी (राजपत्रित अधिकारी) तसेच ब श्रेणी( अ-राजपत्रित) आणि क श्रेणीतील कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या केल्या जाणार आहेत. या भरती योग्य पदांमध्ये, केंद्रीय सशस्त्र दलाचे कर्मचारी, उपनिरीक्षक, हवालदार, स्टेनो, स्वीय सचिव, प्राप्तिकर निरीक्षक, एमटीएस (शिपाई) अशा पदांचा समावेश आहे. मंत्रालये आणि विभागांद्वारे, स्वतः ही भरतीप्रक्रिया मिशन मोडवर पूर्ण केली जात आहे, अथवा, केंद्रीय लोकसेवा आयोग, स्टाफ सिलेक्शन कमिशन, रेल्वे भरती मंडळ अशा संस्थांच्या माध्यमातून ही प्रक्रिया होत आहे. भरती प्रक्रिया जलद गतीने व्हावी, यासाठी ती सुलभ आणि तंत्रज्ञानयुक्त करण्यात आली आहे. पंतप्रधान मोदी यांच्या, युवकांना रोजगाराच्या संधी प्रदान करण्याच्या तसेच नागरिकांच्या कल्याणाप्रति असलेल्या कटिबद्धतेची पूर्तता करण्याच्या दृष्टीने, हे एक महत्वाचे पाऊल ठरणार आहे. पुढील दीड वर्षात केंद्र सरकार आपल्या विविध विभाग आणि मंत्रालयांमध्ये 10 लाख लोकांची भरती करणार आहे. स्वतः सर्व विभाग आणि मंत्रालयांमधील मनुष्यबळ स्थितीचा आढावा घेतल्यानंतर हा निर्णय घेतला, असल्याचं ट्वीट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 14 जून 2022 रोजी केलं होतं. दरम्यान, देशात बेरोजगारीची समस्या सातत्याने वाढताना दिसत आहे. एप्रिलमध्ये देशातील बेरोजगारीचा दर 7.83 टक्क्यांवर पोहोचला आहे. यापूर्वी मार्चमध्ये हा दर 7.60 टक्के होता. CMIE (Centre for Monitoring Indian Economy) संस्थेच्या आकडेवारीनुसार, मार्च 2022 मध्ये शहरी बेरोजगारीचा दर 9.22 टक्के होता.

### राज्यसरकारचे ७५ हजार पदांच्या भरतीसंदर्भात मोठे पाऊल



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत विविध विभागांबाबत मोठे निर्णय घेतले आहेत. नियोजन विभाग, सामान्य प्रशासन विभाग, परिवहन विभाग, माहिती तंत्रज्ञान विभाग, सहकार विभाग, पणन विभाग, गृह विभाग, वित्त विभाग आणि जलसंपदा विभागाकडील मोठे निर्णय घेण्यात आले आहेत. राज्य सरकारनं महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील गट ब, गट क आणि गट डच्या भरतीसंदर्भात मोठा निर्णय घेतला आहे. राज्य सरकारनं नुकतीच ७५ हजार पदांची भरती करण्याची घोषणा केली होती. या पदांची भरती प्रक्रिया राबण्याची जबाबदारी आयबीपीएस आणि टीसीएसकडे देण्यात येणार आहे. महाविकास आघाडी सरकारच्या काळात देखील यासंदर्भातील हालचाली सुरु झाल्या आहेत. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील गट– ब (अराजपत्रित), गट–क व गट–ड पदभरतीसाठी परीक्षा टीसीएस, आयबीपीएस मार्फत नामनिर्देशनाद्वारे घेण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. यामुळे ७५ हजार रिक्त पदे भरतीचा मार्ग सुकर झाला आहे. मागील वर्षाच्या कालावधीत परीक्षांसंदर्भात झालेल्या विविध घोटाळ्यांच्या संदर्भात टीसीएस– आयओएन, आयबीपीएस या कंपन्यांना नामनिर्देशनाने काम सोपवावे असे ठरले होते. त्याप्रमाणे भूतपूर्व महाराष्ट्र दुय्यम सेवा निवड मंडळाच्या कक्षेतील तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील सरळ सेवेची रिक्त पदे ऑनलाईन पद्धतीने वरील संस्थांमार्फत घेण्याचा निर्णय झाला. या कंपन्यांची नामनिर्देशनासह निवड झाल्यानंतर परिक्षांची विहित कार्यपद्धती व इतर अटी शर्ती सामान्य प्रशासन विभाग (सेवा) यांच्यामार्फत निश्चित करण्यात येतील.

## महत्वाची बातमी

### ७१९८ किलो बनावट जिरे जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** डाळ-तांदूळ आणि बनावट कोबीनंतर आता भेसळयुक्त जिऱ्याचीही विक्री होत असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. बाजारातून जिरे विकत घेताना त्यात जास्तीत जास्त काही खडे असावेत, इतकाच विचार आपण करतो. पण, तुम्ही खात असलेले जिरेच जर बनावट असेल तर. दिवाळीच्या तोंडावर राजधानी दिल्लीत कांझावालामध्ये बनावट जिऱ्याच्या संपूर्ण कारखान्याचा पर्दाफाश करण्यात आला आहे. येथे बनावट जिरे बनवले जात होते. दिल्ली पोलिसांच्या गुन्हे शाखेने या कारखान्यावर छापा टाकला तेव्हा तेथून तब्बल ४१९८ किलोहून अधिक बनावट जिरे जप्त करण्यात आले. तर ३,००० किलोहून अधिक बनावट जिरे सापडले. या छाप्यात ४३ वर्षीय कारखाना मालक सुरेश गुप्ता याला अटक करण्यात आली आहे. भुसा, काच आणि दगडाच्या पावडरपासून हे जिरे बनवले जात असल्याचे आढळून आले. हे जिरे सर्वसामान्यांच्या आरोग्यासाठी किती घातक ठरु शकते हे यासाठी वापरण्यात येणाऱ्या गोष्टींवरुन स्पष्ट होते. या कारखान्याचा एक व्हिडिओ देखील समोर आला आहे. ज्यामध्ये जमिनीवर पडलेले आणि गोण्यांमध्ये भरलेले बनावट जिरे दिसत आहेत. सध्या या प्रकरणाचा तपास सुरू आहे. अशातच कधी प्लॅस्टिकचा तांदूळ, नकली कोबीबाबतही बातम्या आल्या आहेत. याशिवाय, बनावट ड्रायफ्रुट्स, भेसळयुक्त तेलाची विक्री हे देखील चिंता वाढवणारे आहे.

## संजय देशमुख यांच्या हाती शिवबंधन

आधुनिक केसरी न्यूज




**मुंबई :** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह ४० आमदारांनी बंडखोरी केल्यानंतर शिवसेना पक्षात ऊभी फूट पडली. या बंडखोरीनंतर उद्धव ठाकरे गटाकडून शिंदे गटातील नेत्यांना रोखण्यासाठी अन्य नेत्यांना बळ देण्याचा प्रयत्न केला जात आहे. आज यवतमाळमधील नेते संजय देशमुख यांनी उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत हाती शिवबंधन बांधले. संजय देशमुख हे शिंदे गटातील नेते संजय राठोड यांचे राजकीय विरोधक आहेत. त्यामुळे उद्धव ठाकरेंकडून देशमुख यांना बळ दिले जात आहे. दरम्यान, संजय देशमुख यांनी उद्धव ठाकरे गटात प्रवेश केल्यानंतर पक्षविस्ताराच्या दृष्टीने महत्त्वाची घोषणा केली आहे. मी पोहरा देवीचे दर्शन घेण्यासाठी नक्की येणार आहे. मेळाव्यासाठी तुम्ही तारीख ठरवा. मी आलोच, असे उद्धव ठाकरे म्हणाले आहेत. महाराष्ट्रातील संस्कारी माणसांना जे झाले ते पटलेले नाही. ज्यांचा आपल्याशी संबंध येणार नाही, तसे लोक आपल्यासोबत येत आहेत. वेगवेगळ्या धर्माचे लोक सोबत येत आहेत. तुम्ही फक्त लढा. जे होत आहे ते आम्हाला पसंद नाही, असे मला लोक म्हणत आहेत. या देशातील लोकशाही वाचवण्याचा हा प्रयत्न आहे, असे उद्धव ठाकरे यावेळी म्हणाले. माझे काय होणार, शिवसेनेचे काय होणार? हे ठरवणारे तुम्ही आहात. मला त्याची चिंता नाही. मात्र देशाचे काय होणार? देशात लोकशाही राहणार आहे की नाही? हा प्रश्न प्रत्येकाने स्वतःला विचारला पाहिजे, असे उद्धव ठाकरे कार्यकर्त्यांना उद्देशून म्हणाले. तसेच मी पोहरा देवीच्या दर्शनाला येणारच आहे. कधी मेळावा घ्यायचा, कुठे घ्यायचा हे ठरवा. मी येणार आहे, असेही ठाकरे यांनी जाहीर केले.

## ब्रिटनमध्ये राजकीय उलथापालथ

### लिझ ट्रस यांनी दिला पंतप्रधानपदाचा राजीनामा

आधुनिक केसरी न्यूज



**नवी दिल्ली :** लिझ ट्रस यांनी ब्रिटनच्या पंतप्रधानपदाचा राजीनामा दिला आहे. त्यांनी पंतप्रधानपदाची जबाबदारी स्वीकारून अवघे काही आठवडेच झाले होते. पुढील आठवड्यात नव्या पंतप्रधानांची निवड करण्यात येईल. पंतप्रधानपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर ब्रिटनमधील महागाईवर नियंत्रण आणण्यासाठी त्यांनी काही धोरणांची अंमलबजावणी केली. या धोरणाचा फटका येथील बाजाराला बसलेला आहे. तर दुसरीकडे त्यांनी ब्रिटनचे नेतृत्व स्वीकारल्यानंतर अवघ्या सहा आठवड्यांत त्यांच्या पक्षात फूट पडली आहे. याच कारणामुळे त्यांनी राजीनामा देण्याचा निर्णय घेतला आहे. लिझ ट्रस यांनी ६ सप्टेंबर २०२२ रोजी पंतप्रधानपदाची जबाबदारी स्वीकारली होती. मात्र अवघ्या ४५ दिवसांमध्ये त्यांना आपल्या पदाचा राजीनामा द्यावा लागला आहे. मागील काही दिवसांपासून ब्रिटनमध्ये अन्नधान्य दरांमध्ये भरमसाट वाढ झाली आहे. याच कारणमुळे येथील महागाई ४० वर्षांतील उच्चांकावर पोहोचली आहे. गेल्या महिन्यात झालेली दरवाढ ही १९८०नंतरची सर्वात मोठी असल्याचे स्पष्ट झाले होते. यामुळे आर्थिक आणि राजकीय संकटात असलेल्या लिझ ट्रस सरकारसमोर महागाईवर नियंत्रण आणण्याचे मोठे आव्हान उभे राहिले होते. ब्रिटनमधील महागाई आणि राबवलेल्या अर्थविषयक धोरणामुळे लिझ यांना राजीनामा द्यावा लागला आहे.


## जयललिता यांच्या मृत्यूच्या तपासाला नवे वळण

### व्हायरल ऑडिओमुळे शशिकला यांच्यावर संशय बळावला

आधुनिक केसरी न्यूज

नवी दिल्ली : तामिळनाडूच्या दिवंगत मुख्यमंत्री जयललिता यांची एक लीक झालेली ऑडिओ क्लिप सध्या व्हायरल होत आहे. या आठवड्याच्या सुरुवातीला अरुमुघस्वामी आयोगाचा अहवाल राज्य विधानसभेत सादर झाल्यानंतर पुढे आलेल्या या ऑडिओ क्लिपमुळे जयललिता यांच्या मृत्यूच्या तपासाला वेगळे वळण लागले आहे. अरुमुघस्वामी आयोगाच्या अहवालात जयललिता यांच्या निकटवर्तीय शशिकला, त्यांचे नातेवाईक डॉक्टर अशिवा कुमार, माजी आरोग्यमंत्री सी. विजयभास्कर आणि माजी आरोग्य सचिव राधाकृष्णन यांची चूक आढळून आली आहे. काही बाबींना गृहित धरून हा अहवाल बनवण्यात आल्याची प्रतिक्रिया यावर शशिकला यांनी दिली आहे. जयललिता यांच्या मृत्यूचे राजकारण सुरू असल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. अरुमुघस्वामी आयोगाच्या अहवालात जयललिता यांच्या मृत्यूवर काही प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. जयललिता यांच्या मृत्यूची वेळ एक तासाने लांबली, अँजिओग्राफी करण्यात आली नाही, याबरोबरच या उपचारांमध्ये शशिकला यांचा हस्तक्षेप होता, असा ठपका या अहवालात ठेवण्यात आला आहे. या घटनाक्रमादरम्यान जयललिता यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू असतानाची त्यांची ऑडिओ क्लिप प्रचंड व्हायरल झाली आहे. या ऑडिओमध्ये जयललिता चिडचिड, तक्रार करताना आणि खोकलताना ऐकू येत आहेत. २०१७ सालाचा डॉ. रिचार्ड बअले यांचा चेन्नईतील पत्रकार परिषदेनंतरचा व्हिडीओदेखील सध्या व्हायरल होत आहे. सुरवातीला समतोल राखणे अवघड होते असे या व्हिडीओत रिचार्ड बोलताना दिसत आहेत. जयललिता यांना परदेशात जाणं गरजेचे आहे का? असा सवाल या व्हिडीओत शशिकला विचारताना दिसत आहेत. त्यावर त्यांचं परदेशात जाणे आवश्यक असल्याचं सांगताच दोघेही त्यावर सहमती दर्शवताना व्हिडीओत दिसतात. दरम्यान, जयललिता यांना उपचारांसाठी परदेशात जायचे नव्हते, असे यानंतर पुढे आले आहे.






विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# समृद्धीचे प्रकाशपर्व

आधुनिक केसरी

ज्ञानेश्वरीत माउली आणखी एका ठिकाणी म्हणतात -
बिंब जरी बचके एवढे
परी प्रकाशा त्रैलोक्य थोकडे ।
शब्दांची व्याप्ती तेणे पाडे अनुभवावी ।।
सूर्यबिंब जेव्हा आपण पाहतो तेव्हा आपल्याला आपल्या हाताने ते झाकता येईल एवढे लहान भासते. पण त्याचा प्रकाश त्रैलोक्य व्यापून टाकतो. शब्दांचेही तसेच असते. शब्द दिसतो चिमुकला पण त्याच्या अर्थात विश्व व्यापण्याची क्षमता असते. आपले हृदय सुद्धा आपल्या मुठीत मावेल एवढे लहान असते पण या हृदयाकाशात एकदा प्रकाशाचा उदय झाला की सारे आयुष्य तो प्रकाशमान करून टाकतो. असेच आपले आयुष्य प्रकाशमान करण्याची शक्ती अक्षरांमध्ये आणि ती अक्षरे ज्या पुस्तकात सामावलेली असतात त्या पुस्तकांमध्ये असते. तुकाराम महाराज म्हणतात -
आम्हां घरी धन शब्दांचीच रत्ने ।
शब्दांचीच शस्त्रे यत्न करू ।
शब्दचि आमुच्या जीवाचे जीवन ।
शब्दे वाटू धन जनलोका ।।
शब्दांचे महत्व संत तुकारामांनी किती यथार्थ वर्णन केले आहे ! पण ज्याला ते कळेल त्यालाच त्याचे महत्व ! एक सुंदर संस्कृत सुभाषित आहे
पृथिव्यां त्रीणि रत्नानि जलंमन्नम सुभाषितम
मूढैः पाषाणखण्डेषु रत्नसंज्ञा विधीयते ।
सुभाषितकार म्हणतो, ‘ पृथ्वीच्या पाठीवर तीनच रत्ने आहेत. मानवाच्या जगण्यासाठी आवश्यक असणारे अन्न, पाणी आणि तिसरी गोष्ट म्हणजे सुभाषित किंवा सुविचार. सुविचार हे चांगल्या वाङ्मयातून, चांगल्या ग्रंथातून आपल्याला मिळतात. म्हणून चांगले ग्रंथ हे सुद्धा रत्नासारखेच मौल्यवान आहेत. पुस्तकच काय परंतु एखादा चांगला विचार किंवा चांगला लेख देखील आपले जीवन बदलू शकतो. म्हणून वाचाल तर वाचाल असे आपण म्हणतो. पण ज्या संस्कृतीची वाटचाल ‘ वाचाल तर वाचाल ‘ इथून सुरु होऊन ‘ वाचाल तर समृद्ध व्हाल ‘ इथपर्यंत जाते त्या संस्कृतीचा उत्कर्ष होतो. प्रख्यात आंग्ल कवी मिल्टन असं म्हणतो, ‘ एखाद्या देशाचे काही साहित्य माझ्या हाती द्या, मग मी तुम्हाला तो देश, त्याची संस्कृती या सगळ्यांची माहिती सांगतो.’ एका सैनिकाची गोष्ट यानिमित्ताने आठवली. हा सैनिक हिमालयात सीमारेषेवर राहून भारताच्या रक्षणासाठी लढा देत होता. त्या ठिकाणी हाडे गोठवणारी थंडी होती. शून्याच्या खाली तापमान गेले होते. त्या कडाक्याच्या थंडीमुळे आणि आपल्या घरापासून दूर असल्याने त्या सैनिकाच्या मनात निराशेचे विचार येत होते. अगदी आत्महत्या करण्याच्या निर्णयापर्यंत तो येऊन ठेपला होता.

(क्रमशः)



## आनंदी पहाट

### चैतन्य हेच अंतिम सत्य

आधुनिक केसरी

जगण्यापलीकडच्या जीवनाचा अनुभव दृश्य कलांमधून अभिव्यक्त होण्यासाठी विश्वातील दृश्य वस्तूंना आपल्या मनात प्रथम अनुभवत्व येऊन त्यांचे मनःप्रतिमांमध्ये रूपांतर व्हावे लागते. प्रत्येक कलावंत आणि संस्कृती यांच्या मनोभूमिकेनुसार हे अनुभवरूप वेगवेगळे असल्याचे समजून घेतले पाहिजे. भारतीयांच्या विचारधारेनुसार विश्वातील ब्रह्मस्वरूप चैतन्य जडाचे अशाश्वत रूप घेऊन इंद्रियगोचर होते. केवळ चैतन्य हेच अंतिम सत्य असल्याचे मानले जाते. इंद्रियगोचर विश्व हे त्याचे बाह्यरूप अथवा प्रकृती किंवा माया असल्याचे देखील म्हंटले जाते. म्हणूनच भारतीय कलेतील वास्तवता, ही पाश्चात्य प्रबोधनाप्रमाणे बाह्यविश्वातील वस्तूच्या निव्वळ गणिती मोजमापनातून निष्पन्न होणारी वास्तवता नसते; तर भारतीय तत्वज्ञानातील द्रष्टा - दृश्य - दर्शन ह्या त्रयीनुसार संवेदनक्षम द्रष्ट्याला दृश्याचे झालेले दर्शन असते. ते निव्वळ वस्तूंचे वस्तुनिष्ठ दर्शन नसते; तर वस्तुमात्रात सळसळणाऱ्या केवळ चैतन्याचे मनोमय दर्शन असते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

प्रत्येक कलेला आपापले शास्त्र असल्याचे आपण समजून घ्यायला पाहिजे. गायन ही कला आहे; परंतू त्याची सुरुवातच शास्त्रीय संगीताने होते. ख्याल, धृपद, धमार, टप्पा, ठुमरी, भजन, गजल असे काही महत्वाचे गायन प्रकार प्रचलित असल्याचे आपल्याला माहित आहेच. नृत्य ही देखील कला आहे; तरीही भरतनाट्यम, कथक, कथकली, कुचिपुड़ी, मणिपुरी, ओडिसी, मोहिनीअट्टम हे सर्वच शास्त्रीय नृत्य प्रकार आहेत. अलीकडच्या काळांत एकूणच अंधानुकरण आणि पाश्चात्यांच्या सांगीतिक संस्कृतीचा आपल्या नवीन पिढीवर असलेला पगडा ह्यामुळे गायन, नृत्य अशा कलेच्या शास्त्रीय बैठकीचे महत्व लोप पावत चालले आहे, ही खेदाची बाब आहे. चित्रकलेच्या बाबतीत देखील साकारलेले चित्र मॉडर्न आर्टच्या नावाखाली विचित्र असल्याची जाणीवच ह्या नवीन पिढीला होत नसल्याचे अधोरेखित करावे असे वाटते.



आधुनिक केसरी

## पंढरीची आता | ओढ लागे ||

गोंदला मी टीळा | भाळी चंदनाचा ||
ध्यास विठ्ठलाचा | मना लागे ||१||

शुभ्र ललाटीची | माया लुप्त झाली ||
काया गंधाळली | हरिनामे ||२||

माळ तुळशीची | रूळता गळयात ||
चैतन्य रोमात | डोलू लागे ||३||

अंतरीची साद | चेतली कृपेने ||
पूर्व संचिताने | धन्य झालो ||४||

टाळ-मृदुंगाचा | गजर ऐकता ||
पंढरीची आता | ओढ लागे ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## “निरूपण”




डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

आधुनिक केसरी

### विनवणी

विनवितो माये तुला। जोडोनिया दोहो कर।
स्वीकारावे उपहार। शब्दमोतियांचे हार।।
आकाशी फिरते घार। पिलापाशी लक्ष फार।
विठोबाची भक्त थोर। जना सांगे गोष्टी चार।।
माये लक्ष माझेवर। घेई मज कडेवर।
हळु घालिते फुंकर। ठेवी हात डोईवर।।
कोणी फुंकिती घागर। उन्मनी भक्तीसागर।
ऐसे मायेचे अंतर। फणसाचा मऊ गर।।
अंबाबाई नाम थोर। उच्चारे स्मरती घोर।
धरिला भक्तीचा दोर। चंद्रहास तिचे पोर।।
४२. श्वास माय स्वये झाली।।
पुण्य माझे फळा आले। माताराणी घरी आली।
जीवन नौरात्र झाले। श्वास माय स्वये झाली।।
सारे काही रे जिंकिले। अंबा माय स्वप्नी आली।
वंदिली तिची पाऊले। हात फिरविते गाली।।
हासणे तिचे पाहता। दिसे श्वेत दन्तावली।
ओठांची गुलाबी छटा। सहस्त्र कमळे लाजली।।
चंद्रहास म्हणे माते। सवे खेळतो पावली।
फेर धरूनी नाचते। संगे जगाची माऊली।।

## ।। दासबोध स्तवन ।।



### मंगलाचरण

आधुनिक केसरी

आज पासून आपण 7 वा दशक अभ्यासणार आहोत श्री समर्थाचें आशिर्वाद व वाचकांचे प्रेम यामुळे मी ईथपर्यन्त आले आहे. यात माझे काही नाही. हे वेगळे सांगायला नको.
अध्यात्मदर्शन म्हणजे काय? सद्ववस्तुंचे किंवा परब्रम्हाचे अंतिम स्वरूप निश्चित करणें हा आध्यात्मदर्शनाचा गाभा असतो. हे विश्व कल्पनेतुन निर्माण झाले.त्यासाठी शुध्द, निर्भेळ परब्रह्म स्वरूप सांगण्याचा प्रयत्न केला. शुध्द परब्रह्म अत्यंत सुक्ष्म,अतींद्रिय,अनंत व अपरंपार आहे.केवळ आणि केवळ त्याच्या एका भागावर हे विश्व दिसते. समर्थ म्हणतात की या विश्वाला पहाण्यासाठी आपल्यात ज्ञानद्रुष्टी असली पाहिजे. परब्रम्हाचे दर्शन होण्यासाठी मनाची साधी सात्विकता, निगर्वीपणा,साधी पण सरळधोपट मनाची अवस्था(,त्याशिवाय का प्रत्येक संत महात्म्याला परमात्मा भेटला) ऊदा,सुदाम्याला श्रीकृष्ण भेटला. असो असे कितीतरी ऊदा देता येतील. पण देहबुध्दीतील “मी” या मी मुळे आत्मबुद्धी प्रौठी मारते व ज्ञानबुध्दी माणसाजवळ असुनही क्षीण होते.



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

मी पणाने विचार करणा-या व्यवहारी बुध्दीला परब्रम्हाचा अतींद्रिय, विशाल,व सुक्ष्म अनुभव संपूर्ण पणे खरा वाटत नाही.
आता पर्यन्त होऊन गेलेले शुक वामदेव,नारद,व्यास,वसिष्ठ,भीष्मपिता मह,श्रीराम, श्रीकृष्ण, यांच्या सारखे ज्ञानी पुरूष अत्यंत प्रामाणिकपणे स्वतःच्या ब्रम्हानुभवाचे वर्णन सांगतात. त्यावर विश्वास ठेऊन आपण खरा मानला पाहिजे. शेगावीच्या ज्ञानयोगी, ज्ञानेश्वर महाराज, तुकाराम महाराज जनाबाई, गोरा कुंभार, अशी भलीमोठी संतांची मांदियाळी तयार होईल की त्यांनी आपल्याला परब्रम्हाचे स्वरूप ऊलगडून सांगितले आपण त्यांच्या अंतरंगात शिरून त्याचा अभ्यास केला तर तो कैवल्यदाता आपल्याला सन्मार्गाचा रस्ता दाखवल्या शिवाय रहाणार नाही. हे 100 टक्के खरे आहे.
जरूरीचे आहे की मी देहच आहे ही आपली कल्पना मोडून मी आत्माच आहे ही गोष्ट मान्य करणे. मी पणाच्या अहंकाराने बुद्धी सतत स्थुलात रहाते. त्यासाठी विवेकाने मी पणा कमी करून अचिंत्याचे चिंतन करण्याचा सारखा अभ्यास करावा.
समर्थ या दशकात आपल्याला अध्यात्म विद्येत पारंगत होण्यासाठी रस्ता दाखवतात. आपण त्या रस्त्यावर जाऊन संतांच्या विचारांना आपल्यात आणण्यासाठी किंवा ते विचार आपल्यात बाणवण्यासाठी प्रयत्नशील असायला हवे हे ही तितकेच खरे आहे.

## संत जनाबाई

आधुनिक केसरी

संत अशी जनाबाईची ओळख. अत्यंत सामान्य जीवनातून अलौकिक अशी यशाची झेप घेणाऱ्या जनाबाईचा जन्म परभणी जिल्ह्यातल्या गोदातीरी असलेल्या गंगाखेडमध्ये झाला. दमा आणि करुंड अशी त्यांच्या आईवडिलांची नावं. हे दोघंही पंढरपूरच्या विठूरायाचे निस्सीम भक्त होते. दोघंही पंढरीची वारी न चुकता करत. जनाबाईंच्या वडिलांनी तिला संत नामदेव यांचे वडिल दामाशेटी यांच्या पदरात टाकलं. तेव्हापासून त्या नामदेव यांच्या कुटुंबाच्या एक घटक बनल्या. पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरासमोर त्यांचा वाडा असल्यामुळे जनाबाईला विठूरायाचं दर्शन रोज घडायचं. त्यातच नामदेवांच्या घरी विठूभक्तीचा सातत्यानं गजर होत असल्यानं त्यांच्या जीवनात पंढरपूर, पंढरीनाथ आणि नामदेव यांना विशेष स्थान होतं. नामदेवांच्या सहवासात त्यांनी पांडुरंगाच्या भक्तीचा ध्यास घेतला. ते जनाबाईचे पारमार्थिक गुरु बनले. त्यामुळेच त्यांना नामयाची दासी म्हणूनही ओळखलं जातं. जनाबाईच्या मनातील श्रेष्ठ गुरूभाव ही तिची शक्ती होती. आयुष्यभर नामदेवांच्या भक्तीमार्गाच्या पाऊलखुणांवरून प्रवास करणारी जनाबाई अखेरच्या क्षणीदेखील गुरूची सावली बनून राहिली. इ. स. १३५० मध्ये आषाढ महिन्यात, कृष्ण पक्षात त्रयोदशीच्या मुहूर्तावर नामदेवांनी देह ठेवला. संत जनाबाई देखील त्याच वेळी नामयाच्या पायरीवर विसावून पांडुरंगात विलीन झाली.अभंग, गवळणी, ओव्यांच्या रुपात अजूनही संत जनाबाई खेडोपाड्यांतील घराघरांत जागती आहे. लाडक्या जनाईच्या आठवणी तिच्या भक्तांनी जीवापाड




जपून ठेवल्या आहेत. जनाबाईच्या माहेर म्हणजे, परभणीतलं गंगाखेड गाव. याच गावात जनाबाईचा जन्म झाला. पुढं संत बनलेल्या जनाबाईची इथं गावकऱ्यांनी समाधी बांधलीय. जनाबाईला जातं ओढू लागणाऱ्या देवाची मूर्ती इथं दिसते. तिच्या सर्व घरकामांत मदत करणारा विठूराया भिंतीवरच्या चित्रांमध्ये दिसतो. दासी जनीचं संत कबिरांनी केलेल्या कौतुकाचा प्रसंगही इथं चितारण्यात आलाय. इथून दरवर्षी जनाबाईची दिंडी पंढरपूरला जाते.

संत जनाबाई आयुष्यभर राहिल्या त्या पंढरपुरात संत नामदेवांच्या घरी. दासी म्हणून राहिलेल्या जनाबाईंच्या वाट्याला इथं काबाडकष्ट आले. पण तिला या कामांमध्ये मदत केली प्रत्यक्ष विठूरायानं. जातं, मडकी, गोवऱ्या असा सगळा जनीचा संसारच पंढरपूरकरांनी इथं जपून ठेवलाय. तिचा हा संसार पाहिल्याशिवाय वारकरी पंढरपुरातून परतत नाहीत. जनाबाईचे अभंग दूरदूपर्यंत लोकप्रिय झाले आणि तिची ख्याती कबिरांच्या कानी गेली, इतके सुंदर अभंग रचणारी ही स्त्री आहे तरी कोण या उत्सुकतेपोटी संत कबीर जनाईच्या भेटीसाठी पंढरीस आले. तिथे आल्यावर त्यांना कळाले की ती नामदेवांच्या घरी कामास आहे. तिथे गेल्यावर त्यांना कळाले की ती गोपाळपुरास गोव-या थापायला गेली आहे, तिला येण्यास काही अवधी लागेल.
दासीचे घरकाम करणारी, गोव-या थापणारी बाई अभंग लिहिते याचे त्यांना फार अप्रूप वाटले आणि ते तिची वाट बघत तिथे थांबण्याऐवजी गोपाळपुरास गेले. तिथे नदीकाठावर दोन पोक्तवयीन स्त्रिया एकमेकीशी भांडत असल्याचे दृश्य त्यांना दिसले. त्या दोघींच्या मधे गोव-यांचा मोठा ढीग होता, गोव-या चोरल्याचा एकमेकीवर त्या आरोप करत होत्या.कबीर काही वेळ त्यांचे भांडण बघत तिथेच उभे राहिले. अन् मग काही वेळाने त्यांनी त्या दोघींना विचारले की, ‘‘इथे जनाबाई नावाची कोणी स्त्री आहे का?’’त्यांच्या या प्रश्नाने दोघींपैकी एक स्त्री उसळून बोलली -‘‘ही काय, हीच की जनी! चोरटी! माझ्या गोव-या चोरून माझ्याशी भांडण करत्येय! अन् वर तोंड करून मलाच शानपन शिकवत्येय.’’त्या बाईच्या या उद्गाराने कबिरांना थोडासा धक्का बसला. **(क्रमशः)**

# आज शेवटचा दिवस

दिव्य मराठी MEDIA PARTNER

Ritu Agrawal's The MAGNET शॉपिंग उत्सव



## गृहोपयोगी व गृहसजावटींच्या वस्तूंचे भव्य प्रदर्शन व विक्री

## SFS दिवाळी Expo

## 17 ते 21 ऑक्टोबर 2022

## सेंट फ्रान्सिस स्कूल ग्राऊंड, जालना रोड, औरंगाबाद.

वेळ : सकाळी ११ ते रात्री ९ पर्यंत.

94.3 MY FM jiyo dil se!

-: नामांकित कंपन्यांचा सहभाग :-

OKINAWA Power the Change · ॲग्रोवर्ल्ड · PATANJALI · Pitambari · VICCO LABORATORIES · SAMRUDDHI UNBREAKABLE PLASTIC · Sudarshan Saur · Uratom · PRATHAM Pest Control Pvt. Ltd. · EUREKA FORBES एक्सचेंज ऑफर उपलब्ध · INFINITY · wellness · VIKRAM TEA REFRESHING INDIA SINCE 1975 · V.CLEAN · RahulRaj Textile · VEER FITNESS · मंगलमूर्ती अमरावती · Ambicon · KHUSHI PERFUMES · YEOLE's NATURAL · supreme · श्री साई ड्रेसेस · भक्ति आपकी... पहचान हमारी... · Sparkle Jewels · PC · KC

शुभारंभ :- वेळ सायं. ४ वाजता.
-: शुभहस्ते :-
मा.ना.अतुलजी सावे साहेब,
सहकार, इतर मागास व बहुजन कल्याण मंत्री, महाराष्ट्र राज्य

• आयोजक •

CONCEPT ADVERTISERS EXHIBITORS
धवल मेहता
मो.: 7066095711

दैनिक दिव्य मराठी
पार्किंग उपलब्ध

RITSAN ENTERPRISES
प्रवेश विनामुल्य

# कोरोना संपलेला नाही

आधुनिक केसरी

करोना अद्यापही जागतिक आरोग्य आणीबाणी असल्याचे जागतिक आरोग्य संघटनेने स्पष्ट केले आहे. तीन वर्षांपूर्वी सर्वात प्रथम जागतिक आरोग्य संघटनेने करोनाला आणीबाणी घोषित केले होते. जागतिक आरोग्य संघटनेचे महासंचालक टेड्रोस गेब्रेयसस यांनी करोनाचा अंत दृष्टीक्षेपात असल्याचे सांगितल्याच्या एका महिन्यानंतर ही माहिती समोर आली आहे. दरम्यान भारतात गुरुवारी करोनाचे २१४१ नवे रुग्ण आढळले आहेत. यासोबतच ॲक्टिव्ह रुग्णसंख्या २५ हजार ५१० वर पोहोचली आहे. जागतिक आरोग्य संघटनेनेने बुधवारी करोना अद्यापही जागतिक आणीबाणी असल्याचं सांगितलं आहे. करोनासंबंधी आंतरराष्ट्रीय आरोग्य नियमन आपत्कालीन समितीने बैठक घेतल्यानंतर ही घोषणा करण्यात आली. टेड्रोस गेब्रेयसस यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना, या महामारीने आपल्याला याआधीही आश्चर्यचकित केले असून, पुढेही करु शकतात असे म्हटले आहे. जागतिक आणीबाणी संपवण्यासाठी समितीने पाच प्राथमिक मुद्दे मांडले आहेत. यामध्ये करोनाचे व्हेरियंट शोधणे, रुग्णांवर उपचार करण्यासाठी वैद्यकीय सुविधा वाढवणे, लसीकरण, परवडणारी उपचारपद्धती यांचा समावेश आहे. समितीने सांगितले आहे की जगातील काही भागांमध्ये करोना संपला अशी समजूत असली तरी, हा सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न आहे जो लोकांच्या आरोग्यावर विपरित परिणाम करतो. भारतामध्ये चाचणी करण्यात आली असताना करोनाच्या उपप्रकाराचे ७० हून जास्त रुग्ण आढळले आहेत. महाराष्ट्र, ओडिशा, पश्चिम बंगाल आणि तामिळनाडूसह अनेक राज्यांमध्ये हे रुग्ण आढळले आहेत. महाराष्ट्रात गेल्या आठवड्याच्या तुलनेत करोना रुग्णसंख्येत १७.७ टक्क्यांची वाढ झाली आहे. आगामी सण लक्षात घेता राज्य सरकारनेही नागरिकांना करोनाच्या नव्या उपप्रकारापासून आपले संरक्षण करण्याचे आवाहन केले आहे. दरम्यान भारतात गुरुवारी करोनाचे २१४१ नवे रुग्ण आढळले आहेत. सणासुदीच्या काळात बंद जागेत व्यक्ती एकत्र आल्यास संक्रमणाची शक्यता वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे सावधगिरी बाळगणे महत्त्वाचे आहे शहाणपणाचे ठरेल. एखाद्याला गंभीर आजार असल्यास काळजी घ्यावी असा सल्ला तज्ज्ञांनी दिला आहे.

# खाली दिव्यांचा तर वर सूर्याचा दीपत्कार!



श्रीकृष्णदास निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**आपल्या भारत देशात हिंदुबांधवांच्या सणाचा राजा दीपावली आहे. यंदा या सणातील प्रकाशोत्सव अर्थात दीपोत्सव दि. २१ ऑक्टोबरपासून सुरू होत आहे. मिणमिणत्या पणत्या, चमकणारे, प्रखर तेजाचे व रंगीबेरंगी प्रकाशाचे बल्ब यामुळे संपूर्ण भारतदेश झगमगणार आहे. हा झगमगाट दि.२६ ऑक्टोबरपर्यंत चालणार आहे. त्यामुळे नागरिकांना आनंदोत्सवाची खुप प्रचिती घेता येणार आहे. दुधात साखर पडावी किंवा दुग्धशर्करा योग जुळून यावा अगदी तसेच यंदा या दीपावलीच्या दरम्यान अनुभवायला मिळणार आहे. कारण आणखी एका प्रकाशोत्सवाचा आनंद आकाशातूनही बरसणार आहे; तो म्हणजेच नयनरम्य ग्रस्तास्त खंडग्रास सूर्यग्रहण होय. त्यातल्या त्यात महाराष्ट्रातील मराठवाडा विभागातील सर्व शहरातून ते मनोहारी दृश्य थोड्या थोडक्या फरकाने का होईना नेत्रांत साठवता येणार आहे, ही फार मोठी उपलब्धी असेल.**

यंदा दिवाळीत मंगळवार दि.२५ ऑक्टोबर २०२२ रोजी संध्याकाळी सूर्यास्ताचे वेळी खंडग्रास सूर्यग्रहण दिसणार आहे. दीपावली निमित्त पृथ्वीवरील भारतभूसह बऱ्याच ठिकाणी दीपोत्सव- प्रकाशोत्सवाची रोषणाई अनभवत असतानाच वर आकाशातही सूर्यग्रहणाची सुंदर रोषणाई बघावयास मिळणार आहे. अशी विश्वासपूर्ण माहिती एमजीएम एपीजे अब्दुल कलाम खगोल- अंतरीक्ष विज्ञान केंद्राने जाहीर केली आहे. याबद्दल अधिक माहिती अशी हाती आली आहे, की आश्विन अमावस्येच्या दिवशी मंगळवार दि.२५ ऑक्टोबर रोजी ग्रस्तास्त खंडग्रास सूर्यग्रहण दिसणार आहे. ते आपल्या भारतासह आशिया खंडातील पश्चिम व मध्यभाग, संपूर्ण युरोप आणि आफ्रिका खंडातील काही भागातून पाहण्याची दुर्मिळ अशी सुवर्ण संधी चालून आली आहे. हे सूर्यग्रहण ग्रहणचक्र- सॅरोस १२४ क्रमांकाचे असल्याचे सांगितले जात आहे. ग्रहण ग्रासण्याची टक्केवारी ही सर्वात कमी उस्मानाबाद येथे ३३ टक्के असणार आहे तर सर्वाधिक जालना येथे ३७ टक्के असणार आहे, हे विशेष!

या प्रकाशोत्सव- दीपोत्सव सूर्यग्रहणानंतर अवघ्या चौदा दिवसातच मंगळवार दि.८ नोव्हेंबर २०२२ रोजी होणारे चंद्रग्रहणसुद्धा आपल्या भाग्यवंत भारतातून दिसणार आहे. त्या दिवशी ग्रहणातच- ग्रस्तोदय चंद्र उगवताना दिसणार आहे, हेही दृश्य डोळ्याचे पारणे फेडणारे असेल, यात शंकाच नाही! यावर्षी जरी सूर्यग्रहण दीपावलीत येत असले तरी २५ ऑक्टोबर रोजी सूर्यग्रहणाचे दिवशी कोणताही सण आलेला नाही. त्यामुळे हे चित्ताकर्षक सूर्यग्रहण फुर्सदीने न्याहाळण्याची नामी सुवर्ण संधीच प्राप्त झाली आहे. जीवघेण्या कोरोना संकटाच्या तब्बल दोन वर्षांनंतर हा दिव्यांच्या झगमगाटाचा दिवाळीचा सण पृथ्वीवर आणि आकाशातही मोठ्या थाटामाटात व उत्साहात साजरा होत आहे, असे म्हणणे वावगे ठरू नयेच!

मराठवाड्यातील शहरांच्या वेळा पाहिल्यास औरंगाबाद येथून संध्याकाळी ४.५० वा. सूर्यग्रहणास स्पर्श होईल. ग्रहणमध्य सायंकाळी ५.४२ वा. होईल. त्यावेळी चंद्रबिंब हा सूर्यबिंबाचा ३६ टक्के भाग व्यापलेला आढळून येईल. आकाशात



पश्चिम दिशेला सूर्यास्ताचे वेळी हे विलोभनीय दृश्य आपल्याला पाहता येईल. त्यानंतर ग्रहणमोक्ष- ग्रहण सुटण्यापूर्वीच सायंकाळी ६.०९ वा. सूर्यास्त- ग्रस्तास्त होईल. ग्रहण लागलेल्या स्थितीतच सूर्य मावळलेला असेल. महाराष्ट्रातील सर्वच जिल्ह्यात ग्रहणातच सूर्यास्त होत असलेला दिसेल. मात्र खगोलप्रेमी, अंतराळ निरीक्षणप्रेमी, अंतरिक्ष अभ्यासक, विद्यार्थी, भूगोलशिक्षक, हौशी छायाचित्रकार यांना ही एक पर्वणीच आहे. मराठवाड्यातील वेगवेगळ्या ठिकाणांहून वेगवेगळ्या वेळी हे सूर्यग्रहण दिसणार आहे. मराठवाड्यातील सर्वच जिल्ह्यात हे सूर्यग्रहण दिसणार आहे. त्यातील आठही जिल्ह्यांमध्ये हे ग्रहण खंडग्रास स्थितीत दिसेल, त्यावेळा अशा- औरंगाबाद शहर- स्पर्श सायं.४.५०, मध्य ५.४२, ग्रस्तास्त ५.५९ वा. जालना शहर- स्पर्श सायं.४.४९, मध्य ५.४२, ग्रस्तास्त ५.५६ वा. बीड शहर- स्पर्श सायं.४.५२, मध्य ५.४३, ग्रस्तास्त ५.५७ वा. उस्मानाबाद शहर- स्पर्श सायं.४.५४, मध्य ५.४४, ग्रस्तास्त ५.५७ वा. हिंगोली शहर- स्पर्श सायं.४.५१, मध्य ५.४२, ग्रस्तास्त ५.५१ वा. नांदेड शहर- स्पर्श सायं.४.५३, मध्य ५.४३, ग्रस्तास्त ५.५१ वा. परभणी शहर- स्पर्श सायं.४.५२, मध्य ५.४३, ग्रस्तास्त ५.५३ वा. लातूर शहर- स्पर्श सायं.४.५४, मध्य ५.४४, ग्रस्तास्त ५.५४ वा. असतील. औरंगाबाद येथे विशेष ग्रहणमहोत्सव आयोजित केला आहे. या ग्रस्तास्त खंडग्रास सूर्यग्रहणानिमित्त नागरिकांत असलेल्या विविध गैरसमजूती व अंधश्रद्धा दूर करून त्यांच्यात वैज्ञानिक दृष्टिकोन वाढीस लागावा, म्हणून दि.२५ ऑक्टोबर २०२२ रोजी टेलिस्कोप ऑनर्स मीटचे आयोजन करण्यात आले आहे. यात ज्यांच्याकडे स्वतःची दुर्बीण आहे त्यांनी उत्स्फूर्त सहभाग घ्यावा किंवा मीटदरम्यान आलेल्या नागरिकांच्या प्रश्नांची अकल करण्यात मदत करावी लागणार आहे. या मीटमध्ये सहभागी होण्यासाठी इच्छुक असणाऱ्यांनी आपली नावे दि.२० ऑक्टोबर २०२२पर्यंत एमजीएम खगोल-अंतरिक्ष विज्ञान केंद्रांकडे नोंदवावयाचे होते.

या ग्रहण दीपोत्सवाच्या निरीक्षणासाठी ग्रहणचष्मे एमजीएम विज्ञान केंद्रातून उपलब्ध करून दिले जातात. सूर्यग्रहण पाहण्यासाठी अत्यावश्यक असे विशेष ग्रहणचष्मे औरंगाबाद येथील एमजीएम एपीजे अब्दुल कलाम खगोल-अंतराळ विज्ञान केंद्रात उपलब्ध आहेत. यासाठी एमजीएम विज्ञानकेंद्र मोबाईल क्रमांक ९८५००८०५७७ वर संपर्क साधता येईल. सूर्यग्रहण हे साध्या डोळ्यांनी पाहू नये. पाहिल्यास दृष्टिदोष उद्भवू शकतात. सूर्यग्रहण हे खास ग्रहणचष्म्यातूनच न्याहाळावे किंवा चाळणीतून सूर्याची प्रतिमा कागदावर घेऊन त्यामध्ये पहावे. आगामी दहा वर्षांपर्यंत सूर्यग्रहण पाहण्याची संधी उपलब्ध होणार नाही. पुढील दहा वर्षांत आपल्या देशातून दोन सूर्यग्रहण दिसतील. यातील दि.२ ऑगस्ट २०२७ रोजी दिसणाऱ्या खंडग्रास सूर्यग्रहणाच्या दिवशी पाऊस पडण्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. त्यामुळे हे ग्रहण दिसण्याची शक्यता शून्यात जमा आहे. तर दि.२१ मे २०३१ रोजी रामेश्वरम येथून कंकणाकृती सूर्यग्रहण दिसणार असून मराठवाड्यात ते खंडग्रास स्थितीत ते दिसण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे यंदाची ही दिवाळीतील ग्रस्तास्त खंडग्रास सूर्यग्रहण पाहण्यास मिळालेली सुवर्ण संधी व्यर्थ दवडू नये, असेच वाटते. मात्र सद्याच्या अभ्राच्छादित वातावरणामुळे याही संधीवर पाणी फिरेल की काय? असे मनात विचारांचे ढग गर्दी करू पाहणे साहजिकच आहे!

# सामाजिक बदलाचे काय ?



श्रीनिवास भोंग
संपर्क क्र. 9423783235

आधुनिक केसरी

**अंधेरीच्या पाठोपाठ हिमाचल प्रदेश मध्ये निवडणुका होतील.नंतर गुजरातमध्ये निवडणुका होतील. कोणी विजयी होईल.कोणी पराभूत होईल. टीव्ही वर सर्व्हे प्रसिद्ध होतील. पारावर चर्चा रंगतील. हिमाचलमध्ये कदाचित कॉंग्रेसला संधी असेल.गुजरातमध्ये भाजपची स्थिती आजतरी तितकी सोपी नाही. आम आदमी पक्ष गुजरातमध्ये किती शिरकाव करील ते आजमितीला सांगता येत नाही. राजकीय बदल होतीलही. पण सामाजिक बदलाचे काय? जोवर सामाजिक लोकशाही अस्तित्वात येत नाही, तोवर आर्थिक लोकशाही अस्तित्वात येणार नाही.**

अंधेरीची पोटनिवडणूक बिनविरोध होण्याची चिन्हे आहेत. यामागे बरीच कारणे आहेत. नाही म्हटले तरी सुषमा अंधारे, संभाजी ब्रिगेड यांची ताकद आता शिवसेनेला मिळाली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे फर्डे वक्ते नाहीत. पण एकदा बोलायला लागले कि घोळवून घोळवून बरोबर मनात शिरतात. शिवसेनेकडे राष्ट्रवादीची ताकद आहे. एकेकाळी शिवसेनेला वसंतसेना असे म्हणत. कारण तेव्हा शिवसेना तत्कालीन मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या ईशाऱ्यानुसार चालत असे. आताच्या शिवसेनेला शरद पवार, संजय राउत, मिलिंद नार्वेकर असे नाव दिले जाते. कारण शिवसेनेच्या निर्णयप्रक्रियेत प्रत्यक्ष अप्रत्यक्षरीत्या या सगळ्या मंडळींची भूमिका किंवा मार्गदर्शन आहे. अंधेरीच्या पाठोपाठ हिमाचल प्रदेश मध्ये निवडणुका होतील.नंतर गुजरातमध्ये निवडणुका होतील. कोणी विजयी होईल.कोणी पराभूत होईल. टीव्ही वर सर्व्हे प्रसिद्ध होतील. पारावर चर्चा रंगतील. हिमाचलमध्ये कदाचित कॉंग्रेसला संधी असेल.गुजरातमध्ये भाजपची स्थिती आजतरी तितकी सोपी नाही. आम आदमी पक्ष गुजरातमध्ये किती शिरकाव करील ते आजमितीला सांगता येत नाही. राजकीय बदल होतीलही. पण सामाजिक बदलाचे काय? जोवर सामाजिक लोकशाही अस्तित्वात येत नाही, तोवर आर्थिक लोकशाही अस्तित्वात येणार नाही.

अंधेरी पोटनिवडणुकीचा अपवाद वगळता देशात कोठेही मुख्यमंत्रीपदासाठी, नेतेपदासाठी महिला, दिव्यांग, तृतीयपंथी यांचे नाव चर्चेत नाही. आज देशात किती ठिकाणी महिला मुख्यमंत्री आहेत?

नुकताच आपण जागतिक अन्न दिवस साजरा केला आणि त्याच वेळी बातमी आली की जागतिक कुपोषण यादीत भारताची स्थिती अधिक खालवली. आपली प्रतिमा डागल्ण्याचा कट आहे असे उत्तर दिले. ते खोटे असेलच असे नाही.

पण अलीकडे माझ्या घराजवळचा रस्ता मोठा झाला. सुंदर झाला. पण या रस्त्याभोवतीची वडाची झाडे कुठे गेली असतील? असे माझ्या मुलाने विचारले. रस्त्याला फुटपाथ झाला. या रस्त्याच्या कडेला बसणारे भाजीवाले, चहावाले आता कुठे गेले असतील? माझ्या पत्नीने विचारले. दोन्ही प्रश्नांना माझ्याकडे उत्तर नव्हते. तुमच्याकडे आहे का? बदल व्हावा, भौतिक विकास व्हावा, सर्वसामान्यांच्या जगण्यात आर्थिक बदलही व्हावा इतकीच अपेक्षा !

# आपण नातेसंबंधाबाबत पाठीमागे का ?



संजय जेवरीकर
संपर्क क्र. 7887307789

आधुनिक केसरी

**मनुष्याइतके स्पर्शज्ञान मला वाटते कुणालाही नसावे अन्यथा लहान मूल आपल्याच आई वडिलांना का ओळखत असावे. कारण फक्त स्पर्श. आपण पक्षी, प्राणी यापेक्षा हुशार असूनही नातेसंबंधाच्या बाबतीत पाठीमागे कसे आहोत? आम्ही नाते जपण्यात आजकाल असमर्थ का होत चाललो आहोत. आई वडील, भाऊ बहीण, नवरा बायको ही नाती आज तकलादू का होत चालली आहेत?**

एका बारश्याच्या कार्यक्रमात त्या छोट्या बाळाला घेण्यासाठी अनेकजण आतुर झाले होते. प्रत्येकाला त्याला स्पर्श करून पहायचे होते, स्वतःच्या मांडीवर घेऊन "ओले ओले बाळा" असे म्हणून आपल्या भावना व्यक्त करायच्या होत्या..सगळेच हैराण झाले, बाळ काही कुणाकडेच यायला तयार होत नव्हते. त्याला फक्त आई, बाबा, आजी, आजोबा यांच्या स्पर्शाचेच ज्ञान होते. कारण उपस्थितांपैकी एकानेही त्याच्या जन्मापासून आतापर्यंत त्याला कधी स्पर्शही केला नव्हता. दर्शन, ध्यान आणि स्पर्शाद्वारे मासा, कासव आणि पक्षी आपापली पिले पोसतात असे वाचण्यात आले. प्रश्न असा आहे की, दर्शन कुणाचे घ्यावे, आपोआप पायाकडे हात जावेत असे पाय शिल्लक नाहीत, ध्यान लावून बसलेल्या एखाद्या सन्याश्यावर विश्वास ठेवावा असे ध्यानी कुठे भेटत नाहीत आणि स्पर्शाशिवाय ओळखण्याची ताकद नसल्यामुळे एखादा स्पर्श अनुभवण्याची आपली क्षमता राहिलेली नाही.मासा आपल्या संततीकडे केवळ पाहून त्याचे पालनपोषण करतो, कासव ध्यानाद्वारे तर पक्षी स्पर्शाद्वारे पालनपोषण करतो. मनुष्यप्राणी या सगळ्यांचा उपयोग अथवा वापर करूनही पालनपोषणात असमर्थ का आहे? मनुष्याइतके स्पर्शज्ञान मला वाटते कुणालाही नसावे अन्यथा लहान मूल आपल्याच आई वडिलांना का ओळखत असावे. कारण फक्त स्पर्श. आपण पक्षी, प्राणी यापेक्षा हुशार असूनही नातेसंबंधाच्या बाबतीत पाठीमागे कसे आहोत? आम्ही नाते जपण्यात आजकाल असमर्थ का होत चाललो आहोत. आई वडील, भाऊ बहीण,



नवरा बायको ही नाती आज तकलादू का होत चालली आहेत? आपल्यामध्ये पालनपोषण केले म्हणजे उपकार केले अशी भावना बळावत का चालली आहे? एक परिपूर्ण नाते तेच असते जे उपकाराची परतफेड करताना त्याचा उल्लेखही करत नाही. नाते असे जपा, ते समृद्ध करा, पक्षी, प्राण्यांना जे जमते ते आम्हाला का जमत नाही? याचा विचार करा. आनंद ही गोष्ट बाजारात विकत मिळत नाही म्हणूनच ती मनाच्या गाभाऱ्यात तयार करा.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# भारतातील संवैधानिक संस्थांवर प्रहार का ?



कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850

आधुनिक केसरी

**राजकारणात कोणेही धुतल्या तांदळासारखा नाही. भाजपा नेत्यांचा भ्रष्टाचार उघड करून जेलमध्ये टाकले पाहिजे! हे कोणी करावयाचे, पंतप्रधान मोदींनीच का? आता राजकीय भ्रष्टाचाराचा आरोप झाले की, मिरवणुकीने चौकशीला जात आहे. राहूल गांधी, सोनिया गांधी, संजय राऊत, नवाब मलिक या नेत्यांना यंत्रणेने चौकशीसाठी बोलावले की हे नेते पदयात्रा! मिरवणूका काढत आहेत. त्यांना क्रांतीकारी म्हंटले जात आहे. हा बेशमपणाचे कळस आहे.**

नांदेडचे ज्येष्ठ पत्रकार सुधाकररावजी डोईफोडे यांच्या स्मृती निमित्ताने ज्येष्ठ पत्रकार सुरेश भटेवरा यांचे 'राजधानी दिल्ली कालची व आजची' या विषयावर व्याख्यान नुकतेच झाले. भटेवरा हे राज्यातील एक ज्येष्ठ अनुभवी, पत्रकार आहेत.त्यांच्याबद्दल आदरही आहे. पत्रकार म्हणून त्यांचा मुळीच विरोध नाही. पण त्यांनी व्याख्यानात बोलताना 'भारतीय लोकशाहीचे चारही स्तंभ विकलांग' झाल्याचे विधान केले आहे. त्यांचा विधानाला आक्षेप आहे. त्यांनी मांडलेले मते बहूसंख्य लोकशाहीवादी लोकांना पटणारे नाहीत. कारण त्यांनी एकांगी बाजू मांडलेली आहे. एखाद्या राजकीय पक्षाचा प्रवक्ता पक्षाची जशी बाजू मांडतो, त्याप्रमाणे वक्ता म्हणून त्यांनी काँग्रेसची बाजू सफाईदारपणे मांडली आहे. भारतीय लोकशाहीचे हेच वैशिष्ट्य आहे, प्रत्येकाला बोलण्याचे व लिहिण्याचे स्वातंत्र्य आहे. ते पंतप्रधान मोदींना रोज शिव्या देऊ शकतात. भाजपा, आर. एस. स.वर टीका करू शकतात, त्यांनी खुशाल कराव्यात! पण राजकीय विश्लेषण करताना देशातील संवैधानिक संस्थावर प्रहार त्या निरूपयोगी झाल्या, असे ते म्हणणे, कोणालाही पटणारे नाही.त्यांनी जे आरोप केले आहेत त्यात तथ्य आहे काय? राजकीय नेत्यांनी असे विधान केले असते तर त्याकडे दुर्लक्ष केले असते! पण राज्यातील एक अभ्यासू पत्रकार वक्ता म्हणून से विधान व निष्कर्ष काढत असेल तर ही बाब गंभीर आहे. मग, पाणी कोठे तरी मुरतेय? असा संशय येवू लागतो.

स्वातंत्र्याच्या ७५ वर्षानंतर आणि केंद्रात सत्तांतर व भाजपाचे सरकार आल्यानंतर त्यांना साक्षात्कार अनेकांना झाला आहे. ते जाणुवपूर्वक डॉ. आंबेडकरांनी लिहिलेली घटना कुचकामी ठरविली जात आहे. वास्तविक भारतीय लोकशाही मजबूत आहे.या लोकशाहीला, घटनेला, नख लावण्याचे कोणाही धाडस करत नाही. कारण देशातील लोक आता जागृत झाले आहेत. काँग्रेसने आणीबाणीच्या माध्यमातून लोकशाहीचा गळा घोटण्याचा प्रयत्न केला. त्याचे पक्षाला परिणाम भोगावे लागले. देशात घटनेच्या चौकटीत संवैधानिक संस्थेचे काम होत असतात. पण त्यांनी न्यायपालिका, संसद, कार्यपालिका, आणि माध्यमांना त्यांनी अपंग ठरविले आहे. जर या संवैधानिक संस्था घटनेच्या चौकटीत काम करत नसतील देशातील खंडपीठाला निरीक्षण करण्याचा व निर्णय देण्याचा अधिकार आहे, तसे खंडपीठाकडे अनेक घटनांत निर्णय दिलेला आहे. या संवैधानिक संस्थावरही अंकूश आहे. या संवैधानिक संस्थानी कोणते घटनाबाह्य निर्णय घेतले? यात त्यांनी न्यायपालिका दवाबाखाली निर्णय देत जात आहे, असा गंभीर आरोप केला. न्यायसंस्थेने आपल्या बाजूने निकाल दिला तर न्यायपालिका निस्पृह म्हंटले जाते. जर विरोधात निर्णय दिला ती मात्र विकल्या गेली! अशी सोयीची भाषा रुढ होत चालली. या न्यायसंस्थेने केंद्र सरकारच्या दबाबाखाली कोणते निर्णय घेतले? हे मान्यवर पत्रकार वक्त्यांनी उघड केले नाही. खरच! असे झाले असेल तर ती प्रकरण उजेडात आणली गेली पाहिजे, पण काँग्रेसने राफेल खरेदी, आयोध्या राम जन्मभूमी जागा, न्या. लोह्या या प्रकरणाचाउल्लेख त्यांनी केला. काँग्रेसने केलेल्या आरोपाचे गुऱ्हाळ ते का चालवत आहेत! हे सर्व प्रकरणे सर्वोच्च न्यायालयात गेली होती. त्याचा फैसला झाला ! यातून काही निष्पन्न झालेले नाही. तो सर्व फूसका बार ठरलेला आहे. या आरोपानंतर २०१९च्या निवडणुकीत जनतेने भाजपाला पुन्हा निवडून दिले. तरी हे विषय पुन्हा पुन्हा चघळले जात आहेत. या आरोपाबाबत मंडळीकडे सबळ पुरावे असतील ते न्यायालयात द्यावीत, पण ते करत नाहीत, तेथे हे कमी पडतात. देशातील सर्वोच्च न्यायालयाच्या निकालावर काँग्रेस कांही विचारवंत व पत्रकारांचा विश्वास राहिलेला नाही, असे स्पष्ट दिसतेय! गेले पंचावन्न वर्षात काँग्रेस सरकार सत्तेत होते, तेंव्हा देशात काय, काय घडले? तेंव्हा संसदेत सर्व विधेयके चर्चा होऊन समंत झाले काय? याचा इतिहास तरूण पिढीला का सांगितला जात नाही! कारण झाले, गेले, गंगेला मिळाले! असे म्हणून सोडून दिले जात आहे. काँग्रेस राजवटीतील काळाकुट्ट इतिहास आहे. त्याचा विसर पडला की काय? १९७५ मध्ये काँग्रेस सरकारने लादलेली आणीबाणी, सत्ताचा गैरवापर, भ्रष्टाचाराला शिष्टाचाराचा दर्जा, तुष्टीकरणाच्या नीतीतून घेतलेले निर्णय तसेच सर्वोच्च न्यायालयाचा निकाल डावलून त्या विरोधात जाऊन शहाबानो प्रकरणी कायदा करणे. घटनेत अनेक दुरूस्त्या करणे तसेच धर्मस्थळाचा कायदा १९९१ कायदा करणे, बोफार्स प्रकरण, कोळसा खाण घोटाळा, चारा घोटाळा, शेकडो भ्रष्टाचाराची प्रकरणे. हे घडले नाही काय? मग हे झाकून ठेवले जात आहे. पण सोयीची बोलायचे, हवेत गोळ्या मारायच्या! देशात जणू आता अराजकता माजली आहे! असा भ्रम निर्माण करणे याची काही जणांनी सूपारी घेतली आहे. यातून भाजपा सरकारच्या विरोधात जनतेत असंतोष निर्माण व्हावा, हाच या मंडळीचा उद्देश आहे. २०१४ मध्ये काँग्रेसची सत्ता गेली. तेंव्हापासून काँग्रेसपक्ष जे आरोप करत आहेत. ते पुढे रेटण्याची काम एक विशिष्ठ वर्ग काम करत आहे. लोकशाहीत विरोधकांचा तो अधिकार आहे. पण आरोपसुध्दा सकारात्मक व देशाच्या, सामान्य माणसाच्या, शेतकरी, अपेक्षित समाजाच्या भल्यासाठी असले पाहिजे. त्यांच्या आरोपात तथ्य व असत्य हे तपासले पाहिजे. हे हे पत्रकार करू शकतात! आता तेच ९५ टक्के लाचार झाले म्हंटल्यानंतर अपेक्षा कोणाकडून करणार? जर मग भाजपा सरकार चुकीचे निर्णय घेत असतील दरबारात त्याचा निकाल लागेलच ना ! २०१४ व २०१९ च्या निवडणुकीत भारतातील मतदारांनी काँग्रेसला नाकारले. न्यायालयांनी केंद्र सरकार व विरोधकांना काही प्रकरणात कानउघाडणी केलेली आहे. पण आता न्यायसंस्थेवर संशय घेण्यापर्यंत मजल गेली आहे. आश्चर्य म्हणजे! काही विचारवंत व पत्रकार "झेलेअण्णा झाले आहेत. ते काँग्रेसची आरोपाची 'री' ओढत आहेत! या विद्वान मंडळीना काँग्रेसचे विचार मान्य आहे काय? हे तरी कबूल करावे. त्यांनी प्रवक्ता म्हणून बाजू मांडावी. काँग्रेस राजवटीतही अनेक महत्वपूर्ण योजना अंमलात आणल्या गेल्या हे नाकारता येत नाही. तसेच मोदी सरकारने अनेक महत्वपूर्ण व धाडशी निर्णय घेतलेले आहेत. देशाची आर्थिक व्यवस्था मजबूत आहे. संस्थाना व लोकांना थेट त्यांचे पैसे खात्यावर जमा होत आहे. काँग्रेस राजवटीत दलाल खात होते. मग तेंव्हा सरकारने काय केले? दुर्याधनाच्या दृष्टीला माणसे पापी दिसत होती! तसे या मंडळीच्या दृष्टीला मोदी सरकारने चांगले निर्णय घेतलेले दिसत नाही. केंद्रात झालेले सत्तांतर, भाजपा सत्तेत आल्यापासून हे पोटदुखी सुरू आहे. म्हणून तर ! केवळ निराशेतून मोदी व भाजपा, आर. एस.एस. लक्ष्य केले जात आहे! तथाकथित विचारवंत पत्रकार व काँग्रेस पक्षाच्या आरोपात साम्य कसे? हा योगायोग आहे काय? ही मंडळी इतकी चाणाक्ष आहे की, लोकांसमोर मात्र लोकशाही घटना, निष्पक्ष आहोत, देशासमोर सत्य बाजू मांडत असे सांगत असले, तरी यांचे 'खायचे दात वेगळे, दाखवायचे दात वेगळे' आहेत. अशीच मंडळी आता संवैधानिक संस्थेवर गंभीर प्रहार, अवमान करत आहे. वास्तविक स्वातंत्र्यापासून संवैधानिक संस्थाच्या धोरणात कोठेही बदल झालेला नाही, व्यवस्था तीच आहे. परवा तर महाराष्ट्रात निवडणूक आयोगाच्या निर्णयानंतर ठाकरे सेनेच्या नेत्यांनी "रखेल' व "वेठबिगार' शब्दाचा प्रयोग केला. इतकेच नव्हे, महाराष्ट्रात मागील अडीच वर्षात सरकारच्या विरोधात लिहिले दोन पत्रकारांना गजाआड केले गेले. सोशल मिडीयावर नेत्यावर आक्षेपार्ह टिप्पणी केली म्हणून तरूणाला हातकड्या घातल्या गेल्या, त्यांना तुरूंगात डांबले गेले. खासदार, आमदार यांनी राज्य सरकारला आव्हान दिले म्हणून देशद्रोह्याच्या खटला भरून तुरूगांत पाठविले गेले. सरकारमधील मंत्री भ्रष्टाचारात जेल मध्ये गेले, ते मात्र चारित्र्यसंपन्न नेते म्हणून त्यांचा कौतूक केल जाते. ते चालते! तेंव्हा या पत्रकारांची तोंडे बंद होती. या घटना महाराष्ट्राला शोभणाऱ्या होत्या का? महाराष्ट्रातील झुंडशाहीने संताची हत्या झाली ती दिसली नाही. हे पुरोगामी महाराष्ट्रात घडलेले सांगितले जात नाही. काँग्रेसभक्तांची 'ताकाला जाऊन भांडे लपवायची' सवय आहे. या मोदी विरोधी मंडळीना भारतासाठी नवीन घटना लिहावयाची आहे काय? केंद्र व संस्थेचा एखाद्या निर्णयावर मतभिन्नता असू शकते. त्यावर आक्षेप, टीका, आरोप करण्याचे स्वातंत्र्य आहे. पण याचा अर्थ! देशातील सरसकट संवैधानिक संस्थाना कुचकामी ठरविणे, कितपत योग्य आहे? संवैधानिक संस्था मोडीत काढावयाच्या आहेत काय? यावर उपाय, सूचना पर्याय असेल तर ते सांगा ! म्हणे! संसदेवर ७६ टक्के विधयेकावर चर्चा होत नाही, असा जावाई शोध लावला गेला. खर तर! संसदेत दोन्ही बाजूने चर्चा होत असते! त्याची संसदेत चर्चेची वेळ, किती सदस्यानी चर्चेत भाग घेतला,याची संसदेच्या दफ्तरी नोंद होत असते.मग संसदेत कोणतेही विधेयक चर्चेविना संमत झाले?त्याचा तपशील दिला नाही. संसदेत सरकारची चर्चेची तयारी असते पण विरोधक गोंधळ घालतात घोषणाबाजी करतात!कुत्र्यासारखे आवाज काढतात.संसदेचे अध्यक्ष वारंवार विनंती करूनही विरोधक चर्चेला तयार होत नाहीत. सरकारची बाजू ऐकून घेण्याची मानसिकता नसते. यातून मग बहिष्कार टाकला जातो. मग सत्तेत विरोधात कोणताही पक्ष असो. हेच संसदेत आजपर्यंत घडत आलेले आहे. संसदेचे वरिष्ठ सभागृह तर राजकीय अड्डा बनलेला आहे! या वरिष्ठ सभागृहात तरी विधेयकातील त्रुटी व सुधारणा सूचविणे अपेक्षित आहे, येथेही राजकीय तमाशा पहावयाला मिळतो! संसदेतील परंपरा राखणे, जशी सरकारची तशी विरोधकांची जबाबदारी नाही काय? पण यावर मात्र गुपचिळी! सत्ताधारी अनेक विधेयक मांडतात व त्याला विरोधही होता! यातून मग बहुमताने विधेयक समंत होतात! केंद्र व राज्य सरकारची विधेयक बहुमताने मंजूर होत आलेली आहेत. संसदेत बहुमताने निर्णय घेण्याच्या प्रक्रियेला घटनेनुसार मान्यता आहे. तसेच आणखी आरोप आहे की, देशातील ९५ टक्के मिडीया लाचार झालेला आहे. हे मात्र खरे आहे. कारण वृत्तपत्र व अनेक वृत्तवाहिन्या भांडवलदाराच्या हातात आहेत. तेच धोरण ठरवित असतात, त्यात श्रमिक पत्रकार काम करतो! तोही नोकरी काम करतो. त्याला मालकाचे ऐकावे लागते. श्रमिक पत्रकाराला स्वातंत्र्य आहे तरी कोठे? यात पाच टक्के मिडीया प्रामाणिक आहे तो कोणता? काँग्रेसची चाटूगिरी करणारा का? मागील सर्वोच्च न्यायालयातील चार न्यायधीशांचे घेतलेल्या पत्रकार परिषदेचे जुने उदाहरण दिले गेले. ती न्यायालयातील कामाच्या नाराजीतून झालेली घटना होती. आता सरकार विरोधात कोणी बोलत नाही! विश्लेषण केले जात नाही! असे धडधडीत बोलले गेले! वास्तविक रोज मोदी सरकारवर टीका, शिव्या आरोप व विश्लेषण होत असते. देशाच्या इतिहिसात इतक्या खालच्या पातळीवरचे राजकारण झाले नाही. त्यावर भाष्य नाही. पत्रकारांनी त्याचवेळी काँग्रेस राजवटीत अशीच चीरफड झाली असती तर! जगात भारत प्रगत देश तेंव्हाच पुढे आला असता! देशातील राजकीय भ्रष्टाचार काढला की, लगेच ईडी व सी. बी. आय. यंत्रणेचा गैरवापर होतोय म्हणून कांगावा केला जातो! मग देशातील बेकारी, गरीबी, महागाई, शेतकऱ्यांचे प्रश्नांची आठवण होते, काँग्रेस सरकार हे प्रश्न सोडवू का शकलेला का नाही? हे प्रश्न तेंव्हाही होतेच ना! काँग्रेस दीर्घकाळ सत्तेत होती त्या धोरणाचा परिणाम नाही काय? भाजपाने निवडणुकीवर दहा हजार कोटी खर्च केला याची माहिती दिली गेली. त्यांचा हिशोब घेणारी यंत्रणा सक्षम आहे. मग काँग्रेस पक्षाचे नेते कोणता व्यवसाय करतात? त्यांच्याजवळ इतकी संपत्ती कोठून येते? राजकीय बेहिशोबी मालमत्ता व नोटांचे ढीग कसे सापडतात! हे प्रश्न विचारले गेले पाहिजेत. राजकारणात कोणेही धुतल्या तांदळासारखा नाही. भाजपा नेत्यांचा भ्रष्टाचार उघड करून जेलमध्ये टाकले पाहिजे! हे कोणी करावयाचे, पंतप्रधान मोदींनीच का? आता राजकीय भ्रष्टाचाराचा आरोप झाले की, मिरवणुकीने चौकशीला जात आहे. राहूल गांधी, सोनिया गांधी, संजय राऊत, नवाब मलिक या नेत्यांना यंत्रणेने चौकशीसाठी बोलावले की हे नेते पदयात्रा! मिरवणूका काढत आहेत. त्यांना क्रांतीकारी म्हंटले जात आहे. हा बेशमपणाचे कळस आहे. राजकारणातील नैतिकता शब्द हद्दपार झालेला आहे. काँग्रेस राजवटीत किती किती भ्रष्टाचार झाला? हे सामान्य माणसांचे प्रश्न आहेत. याचे उत्तर मिळणार नाही. म्हणतात ना! दुसऱ्याच्या डोळ्यातील कुसळ दिसतेय पण आपल्या डोळ्यातील मुसळ दिसत नाही, तसे झाले आहे, सध्या तर राजकीय चाटूगिरी करणाऱ्या पत्रकारांची संख्या वाढत आहे. ज्येष्ठ पत्रकारांनी काँग्रेसकडून खासदार व इतर पदांची बक्षीसे मिळवून घेतली आहे. आज देशात पीएफआयच्या देश तोडण्याचे षडयंत्र रचले जात आहे. तसेच दुसरीकडे धर्माच्या नावावर 'सीर तनसे जूदा', असे म्हणत खुलेआम मुडदे पाडले जात आहेत, हिंदूंना लक्ष्य केले जात आहे. देशात व्देषाचे राजकारण कोण करत आहे? यावर भाष्य,चिंचा नाही. काँग्रेस व भाजपा सरकारच्या धोरणांची तुलनात्मक मांडणी केली असती तर ते योग्य ठरले असते! पण त्यांनी एकतर्फी झोडपून काढले आहे! पण काही असो! नांदेड मनपाने मात्र काँग्रेसला खूष करणारा वक्ता निवडला! या मागे सल्ला कोणाचा होता? पत्रकार वक्ता म्हणून जे विधान केले, जी मते मांडली ती पडखड व निष्पक्ष आहेत,असे म्हणता येणार नाही.

# काहीच अडलेलं नाही का?

अपने को क्या चाहिए? ब्रेड और बटर! बास!
एका कंपनीच्या मीटिंगमध्ये त्यांचे बॉस टाय, कोट लेवून एवढेच सांगत होते... पाव आणि लोणी!
इतका किमान हेतू कसा असू शकतो माणसाच्या जगण्याचा? ही तर उंदरांची महत्त्वाकांक्षा झाली! नंतर लक्षात आले की, जगातले सगळे पाव आणि जगातले सगळे लोणी आपल्यालाच मिळावे यासाठी अशी मीटिंग दर आठवड्याला होते. (आणि मग 'रॅट रेस' सुरू होते.)
निसर्ग, समाज, संस्कृती अशी रसदार फळे करकचून पिळून फायद्यात रूपांतर करणारी आधुनिक माणसे आज या जगाचे लगाम हाती घेऊन बसली आहेत. त्यांचे तीक्ष्ण सुळे किती धारदार आहेत हे दाखवणारे एक मराठी नाटक 26 जून रोजी औरंगाबादेत पाहिले. 'अडलंय का?' असे विचित्र नाव असलेले हे नाटक आहे. जर्मन लेखक चार्ल्स लेविन्स्कीच्या 'द ऑक्युपेशन' या नाटकाचे शौनक चांदोरकर यांनी मराठीत भाषांतर केले आहे (हे सांगितले तरच कळते.)
निपुण धर्माधिकारी यांचे अद्भुत दिग्दर्शन आणि नेपथ्यासह इतर तांत्रिक गोष्टी सांभाळणाऱ्या टीमला तर प्रणामच करावा. अतुल पेठे हा नाटकातला बापमाणूस आणि पर्ण पेठे ही तितकीच अफाट वेडी लेक. त्यांचा रंगमंचावरील अकल्पनीय धुमाकूळ तुम्ही अजूनही पाहिला नसेल तर स्वतःची नाडी तपासून घ्या. नाडीचे ठोके सुरू असतील तर आजच उठा आणि हे नाटक पाहण्यासाठी जा!
ही केवळ एक नाट्यगृह वाचवण्याची गोष्ट नाही. ही गोष्ट आपल्या आयुष्यात आलेल्या निष्ठूर वादळाची आहे. तुमच्या जिवाचे मोल आहे म्हणून तुम्हाला जगू दिले जात नाही, तर तुमचा काही उपयोग आहे म्हणून तुमच्या जगण्याची फिकर केली जात आहे. उपयोग संपला की तुमच्या जगण्यात कपात होईल. तेव्हा काय कराल? कुठलाही सरकारी, खासगी खर्च कमी करताना आधी कलाकारांचे मानधन कमी केले जाते. नाट्यगृहांवरचा खर्च कमी करून ती बंद पाडली जातात. कला ही अत्यंत अनावश्यक गोष्ट आहे. फार तर मनोरंजनापुरती तिची



औकात आहे एवढेच या पाव-लोणीवाल्यांचे आकलन आहे. एक तर 'उथळ कलेचा बाजार' मांडा किंवा नाट्यगृह पाडून तेथे बिग बाजार मांडा असे दोनच पर्याय तुमच्यापुढे असतील तर काय कराल? माणूस

विनोद जैतमहाल

आणि जनावरांमध्ये 'प्राणी' म्हणून फारसा फरक नसतो. परंतु माणसांनी फक्त सुख-दुःखे भोगावी आणि मरून जावे हे निसर्गालाही मान्य नाही. कला, संस्कृती, इतिहास या वाटेने प्राण्यांच्या पातळीवरून थोडासा वर येतो तो खरा माणूस. जनावरांना इतिहास, संस्कृती नसते. (किंवा ज्यांना इतिहास, संस्कृती नसते ती जनावरे असतात.) केवळ लोलुप डुकरासारखे जगणे किंवा खरकट्या पत्रावळीचा तुकडा होऊन उकिरड्यावर पडून राहणे हे दोन्ही पर्याय नामंजूर असलेल्या माणसांचे नवे जग आपल्याला नको आहे का? त्यावाचून आपलं काहीच अडलेलं नाही का? त्या नव्या जगाचा कवडसा म्हणजे हे नाटक आहे. सूर्य अजून त्यापलीकडे आहे. तोही आपल्याला पाहायचा आहेच.

# जागतिक उपासमार निर्देशांकात भारत १०७ व्या स्थानी

आधुनिक केसरी

**ग्लोबल हंगर इंडेक्सची २०२२ या वर्षीची यादी जाहीर झाली आहे. ग्लोबल हंगर इंडेक्स २०२२ मध्ये भारताची सहा स्थानांनी घसरण झाली आहे. भारत आता १२१ देशांच्या यादीत १०७व्या स्थानावर आहे. या यादीमध्ये भारताची अवस्था या एका गोष्टीवरून कळू शकते की दक्षिण आशिया देशात अफगाणिस्तान वगळता अन्य सर्व देश भारताच्या पुढे आहेत.**

ग्लोबल हंगर इंडेक्स २०२२ मध्ये भारताला २९.१ इतके गुण मिळाले आहेत. भीषण पुर परिस्थिती असलेला पाकिस्तान आणि आर्थिक संकट असलेला श्रीलंका देखील भारताच्या पुढे आहेत. इतक नाही तर बांगलादेश, नेपाळ, म्यानमार या सर्व देशांना भारतापेक्षा चांगले रँकिंग मिळाले आहे. हंगर इंडेक्समध्ये भारत आता झाम्बिया, सिएरा लियोन, लायबेरिया, हैती, रिपब्लिक ऑफ कॉन्गो या देशांच्या पंक्तीत पोहोचला आहे.
हंगर इंडेक्समध्ये भारत आता झाम्बिया, सिएरा लियोन, लायबेरिया, हैती, रिपब्लिक ऑफ कॉन्गो या देशांच्या पंक्तीत पोहोचला आहे. पाकिस्तान २६.१ गुणांसह ९९व्या, बांगलादेश १९.६ गुणांसह ८४व्या, नेपाळ १९.१ गुणांसह ८१व्या स्थानावर आहे.

किशोर सांगळे
नागपूर

### काय असतो Global Hunger Index आणि कोण प्रसिद्ध करते

वेगवेगळ्या NGO स्वतःचा हंगार इंडेक्स तयार करत असतात. या शिवाय जागतिक आरोग्य संघटना देखील हंगर इंडेक्स तयार करते. आता जो हंगार इंडेक्स आला आहे तो NGOs- Concern Worldwide आणि Welthungerhilfe मिळून तयार केला आहे. हा रिपोर्ट तयार करण्यासाठी संयुक्त राष्ट्र, युनिसेफ आणि फुड ॲण्ड अग्रीकल्चर



ऑर्गनायजेशनसह अन्य संघटनांचा डेटा वापरला जातो.

### कोणत्या आधारावर तयार होतो?

ग्लोबल इंगर इंडेक्स तयार करण्यासाठी WHO तीन गोष्टींचा विचार करते. यात अन्नधान्याची कमी, मुलांचे कमी पोषण आणि बाल मृत्यू या गोष्टींचा विचार केला जातो. तर NGOs- Concern Worldwide आणि Welthungerhilfe हे अंडरनरिशमेंट, चाइल्ड स्टंटिंग, चाइल्ड वेस्टिंग आणि चाइल्ड मॉर्टलिटी म्हणजेच अल्पपोषण, कुपोषण, अपुरी वाढ आणि बालमृत्यू या आधारावर इंडेक्स तयार करते.

# कष्टकरी जीवनाचा लालित्यपूर्ण आलेख : बापाचे पाय उगवलेली माती



किरण डोंगरदिवे
संपर्क क्र. 7588565576

आधुनिक केसरी

**मातीचा गाव मातीची आज गातो गोड गाणी । नाही कुणीही मातीचा सोयरा आभाळावाणी ।। अश्या काळ्या मातीचा गौरव करणारी शब्दकळा पेरणारे आजच्या पिढीतील एक समृद्ध नाव म्हणजे संदीप गवई होय. संदीप निवृत्ती गवई है साहित्य प्रांताला चित परिचित असलेले कवी आहेत. कवितेपेक्षा कथाकार म्हणूनही त्यांनी आपल्या लेखनाचा ठसा महाराष्ट्राच्या मातीत उमटविला आहे. जोखड, पिवळ्या बाभळी, अशा त्यांच्या साहित्यकृती वाचकांना कायमस्वरूपी लक्षात आहेत. ग्रामीण संस्कृतीशी नाळ जोडून काळया मातीवर निष्ठा असलेल्या शेतकऱ्याप्रमाणे संदीप गवई यांचे साहित्यविश्व ग्रामीण जनजीवनाचा चेहरा रेखाटणारे आहे.**

कवी, कथाकार आणि चित्रकार असलेले संदीप गवई व्यवसायाने शिक्षक आहेत. हलाखीच्या परिस्थितीतून दिवस काढून स्वतःचे भविष्य घडविणाऱ्या संदीप गवई यांना आपल्या या जीवनसंघर्षात वडिलांच्या कार्यकर्तृत्वाचा अभिमान आहे. कोरोना काळात नियतीने त्यांच्या वडिलांना हिरावून घेतले, त्याचे दुःखद पडसाद या संग्रहात उमटलेले दिसून येतात. 'मी तुमच्यातून उगवलो, आणि आता तुम्ही माझ्यातून उगवत आहात...' या दोन ओळीच्या परिपूर्ण महाकाव्याच्या जाणिवेला अर्पणपत्रिका म्हणून वडीलांना श्रद्धांजली देणाऱ्या संदीपच्या मनात वडिलांबद्दल किती अतीव प्रेम आहे हे वेगळे सांगण्याची गरजच उरत नाही. 'बापाचे पाय उगवलेली माती ह्या सुंदर शीर्षकासह संदीप गवई यांच्या कविता आपले मन जिंकून घेतात. 'वावराच्या कविता' आणि 'आभाळमायेच्या कविता' अशा दोन उप शीर्षकासह हा कवितासंग्रह आपल्याला वाचावा लागतो.

सोसला ऊन वारा अंधार जीवनभर
झाडांनी ठरवले बांधायचे आता घर

अशा ओळी वाचल्यावर एक वेगळी संकल्पना आणि जाणीव घेऊन संदीप गवई यांची कविता या संग्रहातून आपल्याला भेटणार आहे हे आपल्या लक्षात येते. झाड असो वा शेतकरी त्यांचे जीवन परोपकाराने इतरांच्यासाठी कष्ट करत संपत जाते मात्र कधीतरी ह्या परोपकारी झाडाच्या मनात स्वतःसाठी घर बांधण्याची इच्छा जन्म घेते. या ठिकाणी हे झाड शेतात राबणाऱ्या कष्टकरी शेतकऱ्याचे प्रतीक आहे असे मला वाटते. आज देशभरात शेतकऱ्याची जी दयनीय अवस्था निर्माण झाली आहे त्यामुळे स्वतःसाठी नाही पण निदान आपल्या पुढील पिढीने आपल्याप्रमाणे खस्ता खात उघड्यावरचे जीवन जगू नये म्हणून त्याच्या डोक्यावर छप्पर बांधून ठेवावे अशा संकल्पनेत झाड सुद्धा जीवनातील स्थिरता आणि सुरक्षितता शोधत आहे असे कवी म्हणतात, या ठिकाणी सुरक्षेचा विचार करत असतांना झाड, निसर्ग आणि जंगले माणसाच्या स्वार्थी वागण्यामुळे सुरक्षित राहिले नाहीत त्यामुळे सुद्धा स्वतःच्या सुरक्षेसाठी घर बांधावे ही संकल्पना कवीने वापरली असावी असेही वाटते.

निसर्ग आणि झाडी याशिवाय शेती मातीच्या कविता लिहिताना कवींनी पावसाचे रूप शब्दांकित करताना अतिशय सुंदर शब्दांचा वापर केलेला दिसून येतो जसे_

झुलतोय बाई फांद्यांचा ग झुला
आनंदगंधाने ऋतू भिजे ओला
आभाळ काजळी झाडांच्या मिठीत
पावसाचे रूप आभाळ भेटीत

ना. धो. महानोर, विठ्ठल वाघ अशा निसर्ग कवींच्या काळानंतर पावसावरील इतकी तरल आणि अलवार कविता मराठी मध्ये फार अभावाने सापडते. आणि संदीपला तशी कविता लिहीणे सहज शक्य होते ह्यात कवीच्या सूक्ष्म निरीक्षणासोबत निसर्गातील ऋतुगंधाशी एकरूप होण्याची इच्छाशक्ती या ठिकाणी दिसून येते.

संदीप गवईच्या कवितांचा विचार करत असताना त्याच्या कवितांमध्ये नात्याची हळवी लकेर जपण्याचा प्रयत्न दिसून येतो. कष्टकरी आणि शेतकरी जनजीवनात सातत्याने कष्ट आणि राबणे याशिवाय नात्यांची जोपासना आणि जपणूक हा भाव सुद्धा अधोरेखित झालेला दिसून येतो. वडिलांच्या बाबत संदीप गवई यांचा हळवा आणि कातर स्वर आपल्याला कवितांमधून वारंवार दिसून येतो.

स्वप्ने हिरवी गावांन, पुन्हा अंथरली रानी
जोडी आभाळाला हात, बापा बरसू दे पाणी
बाप पाणी बरसला, स्वप्न हिरव फुललं
हिरव्याची माया अशी, गाव प्रेमात भुललं

पावसाळ्यात पाणी पडावा म्हणून देवाची आळवणी करताना देवाला बाप म्हणून संबोधणे, बापाकडे आपण जसा हट्ट करतो तशा हट्टाने देवाकडे पाऊस मागणे, पाऊस आला तर त्या पावसाला सुद्धा बाप म्हणून संबोधने यातून कवी अज्ञात शक्ती म्हणजे देव किंवा इतर, निसर्गाचे रूप पाऊस, आणि आपल्याला समृद्ध करणारा, आपला हट्ट पुरवणार बाप या तिन्ही संकल्पना आणि संबोध एकमेकात गुंतूवून त्यांना एकजीव करून त्या तिन्हीलाही एकाच पातळीवर नेऊन ठेवतात.

संदीप गवई यांच्या कवितेमध्ये नात्यांची अलवार आणि हळुवार जोपासना करणाऱ्या, नात्यांची ऋण स्वीकृत करणाऱ्या आणि या ऋणातून उतराई होण्यासाठी या नात्यांचा शब्दगौरव करणाऱ्या कविता आपल्याला वाचायला मिळतात.

थेंब बापाच्या घामाचे जेव्हा मातीत रुजले
घरातल्या चुलीवर अन्न तेव्हाच शिजले


अशा शब्दात कवी बापाचे कष्ट अधोरेखित करतात आणि कष्टकरी बापाच्या ऋणाचा निर्देश करतात. हा बाप कष्ट करतो पण या कष्टाचे माप त्याच्या हाती नसते. निसर्ग त्या बापाच्या स्वप्नाची कशी राखरांगोळी करतो हे सांगताना याच कवितेत कवी पुढे म्हणतात_

आभाळानं फुंकरली आग काळ्या पावसाची
स्वप्न हिरवी कोवळी गेली जळून बापाची

कष्टकरी शेतकरी बाप आपल्या संसारासाठी आणि लेकराबाळांसाठी सातत्याने कष्ट करत असतो. मात्र कधी निसर्गाचा लहरीपणा आणि शासकीय स्तरावरील किंवा सामाजिक स्तरावरील त्याच्या पदरी येणारी निराशा यामुळे कुटुंबाच्या पदरात सुखाचे चार क्षण पडतच नाहीत ही जाणीव संदीप गवई यांची कविता करून देत असते. ज्याप्रमाणे इंद्रजित भालेराव यांची कविता बापाची आहे की शेतकऱ्याची आहे हे सांगता येत नाही, त्याचप्रमाणे संदीप गवई यांच्या कवितेतील जे बापाचे वर्णन येते त्यांच्या कष्टकरी वडीलाचे आहे की हे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे आहे ते सांगणे कठीण आहे इतके ते एकरूप झालेले दिसून येते. बापाने दिलेली शिकवण कायमस्वरूपी आपल्या जीवनामध्ये रुजवून घेत कवीचा जीवनक्रम सुरू आहे.

ढालच हो, नको तलवारः हे बापाचं कथन
बापाचे पाय उगवलेली माती करू दे जतन

अशा ओळीतून आजच्या आग ओकणाऱ्या वर्तमानात आपल्या लेकरांना वडिलांनी काय शिक्षण दिले पाहिजे याचा आदर्श दिसून येतो. आजच्या हिंसक वातावरणात भ्रष्टाचार, अत्याचार, हिंसाचार, अनीती. अन्याय यापासून स्वतःचे आणि समाजाचे रक्षण करण्यासाठी ढाल झाले पाहिजे, ती होणे आवश्यक आहे अन्यथा आपला निभाव लागणे कठीण आहे मात्र त्यावेळी आपल्याकडून दुसऱ्याला त्रास होणार नाही ह्यासाठी आपण काही झाले तरी तलवार होता कामा नये ही गौतम बुद्धाची शिकवण कवीचे वडील देतात. तलवार हे कापण्याचे प्रतीक आहे तर ढाल हे अन्यायापासून स्वतः चे व इतरांचे रक्षण करण्याचे प्रतीक आहे. यापूर्वी या पद्धतीचा विचार देणारी कविता माझ्या तरी निदान वाचनात आलेली नाही. ह्या अशा नवीन संकल्पनांसाठी संदीप गवई यांचे कौतुक करावे असे वाटते. बापावर असलेल्या अत्याधिक प्रेमापोटी आणि त्यांनी दिलेला आंबेडकरवादी विचारसरणीचा वारसा यामुळे कवीची वैचारिक बैठक भक्कम आहे. 'माप', 'स्वप्ने झाडांची', 'माथा', या कवितेसह 'बैल' या कवितेत भेटणारा कवीचा बाप कष्टकरी जीवनाचे प्रातिनिधिक रूप आहे.




बाप नाही आता कुठे तरी इथं आहे बाप
सरला तरी उरला त्याचं आभाळाचं माप
माझ्या ओंजळीत आहे माझ्या डोळियात आहे
रक्ता नसातून बाप सारखा वाहत आहे.

या शब्दातून कवीचा बापावरील अत्याधिक जिव्हाळा, आपुलकी आणि प्रेम दिसून येतेच. शिवाय आज भौतिक रूपात बाप नसला तरी त्याचा विचार त्याची शिकवण कायम असल्याची जाणीव कवींच्या शब्दातून सातत्याने दिसून येते.

बापा प्रमाणेच संदीप गवई यांच्या कवितेमध्ये माय चे कष्टकरी आणि संघर्षमय जीवनाचे दर्शन होते.

कुस गर्भार मातीची गंधभरले उदर
माय निघे वावरात तान्हे ओढते पदर

भिजलेल्या मातीचा गंध, तान्ह्या लेकराचे पदर ओढणे, आणि वावरात निघालेल्या मायच्या जीवाची होणारी घालमेल कवीने टिपली आहेत. इथे असे मांडताना एका दुसऱ्या कवितेत कवी म्हणतात__

मायच्या मनात पावसाचा धाक
पायाने ऐकली तान्हुल्याची हाक

लेकरांच्या काळजीने लेकराकडे धाव घेणारी माय संदीपच्या कवितेत आपल्यला भेटते. 'भाकरीचे पीक', 'संसारगाथा', 'स्वप्नी आली माती', 'घराला निघाली माय' अश्या कवितेतून मायच्या कष्टाची आणि जीवन संघर्षाची ओळख कवी करून देतो. तर कधी ह्या कष्टाचे चीज झाले आणि संसाराचे हे वावर फुलले, बहरले, समृद्धी आली ह्याचे समाधान मानणाऱ्या मायच्या मनातील स्पंदने टिपत कवी म्हणतात.

आलं वावर फुलून गं
गेल्या लुगड्याच्या गाठी
सोन्यान भरली वटी

ही समृद्धता आणि संपन्नता आली ती माय बापाच्या एकत्रित कष्टातून आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर ह्यांच्या विचारातून ह्यांची जाणीव कवीला आहेच. मात्र बापाच्या निधनानंतर कवी स्वतः कोसळून जातो. तो शब्दप्रभू आहे म्हणून कवितेत व्यक्त होतो हा आजच्या वर्तमानातील नित्य अनुभव आहे. मात्र आपल्याप्रमाणेच बापाच्या जाण्याचे दुःख आईला किती मोठ्या प्रमाणात असेल ह्या जाणिवेतून तिच्या दुःखाला आणि तिच्या भावनेला शब्दांकित करत कवी लिहितात ती 'माझा हरपला देव' ही कविता काळजाचा वेध घेणारी ठरते. प्रथमदर्शी कोरड्या दुष्काळामुळे पीक करपून गेल्याची जाणीव करून देणारी ही कविता

माझा विठ्ठल रुसला, माझं पीक करपलं
माझ्या भाळी गेले तडे, माझं मन हरपलं
जन्म कोरडवाहूचा माझं झालं रे दुर्दैव
माझा फाटला संसार, माझा हरपला देव

अश्या रीतीने घरधनी पुढे निघून गेल्याचा विलाप करणाऱ्या संसारी स्त्रीचे दुःख सुद्धा मांडते हे लक्षात घ्यावे लागते. शेती मातीच्या कवितेतून नात्यागोत्याचे गुंफण किंवा नात्यागोत्याच्या शिवारात फुललेलं समृद्ध पीक दर्शवणारी कविता संदीप गवई यांनी लिहिली आहे असे हा संग्रह वाचतांना जाणवत राहते. नदी या कवितेत माहेरपणाला जाणाऱ्या लेकीबाळी तर

थेंबभर आभाळ बाभूळ बहरलेली
जशी पिवळ्या फुलांनी नववधू सजलेली

अशी निसर्गाच्या रुपाची हळुवार नोंद कवी घेताना दिसतात. गाईचे हंबरणे, पक्ष्यांची चिवचिव थांबणे, लोण्यावाणी चिखलातून पोर अनवाणी पळणे. अश्या शेतीमातीतील जाणिवा देणारे शब्द कवींनी कवितेत पेरले आहेत. पाऊस येतो तेंव्हा सजनाच्या चातक ओढीने त्याची वाट पाहणारे बळीराजाचे मन, तर कधी पावसाच्या थेंबाना मोती म्हणून ओळखणे इत्यादी सौंदर्यात्मक वर्णनातून कविता आणखी आकर्षक होत गेली आहे. मात्र विविध शब्दलाघव वापरूनही ही कविता कोठे शब्दबंबाळ झाली नाही ही कवीच्या जाणिवेची अर्थसमृद्धी आहे, असे म्हणावे लागते. आपण मात्र जगरहाटी पासून दूर राहू शकत नाही, हे त्रिकालाबाधित सत्य कवीने सुद्धा अनुभवले आणि म्हणूनच निर्मळ नितळ मनाच्या कष्टकरी, कामकरी परिवारातून आलेल्या संस्कारक्षम कविताच्या मध्ये

कुणी घातला हा पाठीत सूरा ?
किंवा
चोराच्या मुखावर सावाचा मुखवटा

अश्या स्वार्थी आणि दगलबाज अनुभवनाही कवीला शब्दबद्ध करावे लागते ही आजच्या काळाची अपरिहार्यता आहे असे म्हणावे लागेल.

ही वस्ती दुर्गंधीने वेढली
मंदिरात चाले गजर

असे सांगून आपल्या स्वार्थी वर्तनासह लोक मंदिरामध्ये गर्दी करत आहेत हा दुटप्पीपणा सुद्धा कवीला अधोरेखित करावा लागतो. मात्र अशा या वर्तमानातही आम्ही बुद्धाचे साथी असून आम्हाला तारणारा बुद्धाचा सम्यक मार्ग आहे असे सांगायला कवी विसरत नाही. 'इथे अंकुरला दीप' सारख्या कवितेत संसार वेलीवर संतती फुलांच्या मृदुल सुखानुभूतीची जाणीव तर कधी 'सख्याच्या आनंदासाठी चांदण्या गुंफणारी साजणी' ह्या कवितेतून वाचकांना भेटते. घर-परिवार, नातेगोते, शेती-माती, सुख-दुःख, वर्तमान संसारातील संपन्नता, भूतकाळातील दारिद्र्य, भविष्यातील आशावाद अशा सर्व बाबी ह्या कवितांमधून वाचकांना भेटत असतात. अगदी कवीच्या शब्दात सांगायचे तर या कविता म्हणजे घर मेणाचं, अंगण शेणाचं अश्रू मोत्याचे शब्द नात्याचे या ओळींचा परिपाक आहे. इतकी अलवार आणि हळुवार कविता आजच्या काळात अभावानेच वाचायला मिळते. कधी शाब्दिक सौंदर्यात कवितेचा अर्थ अनाकलनीय होऊन जातो तर कधी दुःख आणि स्वतःला अन्यायाविरुद्ध लढणारा योद्धा म्हणून स्वतःची प्रतिमा जपणारी आजच्या काळातील कविता अनेकदा हिंसक होताना दिसते. मात्र संदीप गवई कोणत्याही दुःखास गोंजारत नाहीत. आक्रस्ताळेपणा आणि उरबडवेपणा तर त्यांच्या कवितेत कधीच नसतो. आपण फार काही बदलून टाकणारे आहोत असा त्यांचा अट्टाहास नसतो तर 'अत्त दीप भव' या बुद्ध तत्त्वावर विश्वास ठेवून त्यांनी स्वतःचे जीवन तिमिरातून तेजाकडे नेले आहे, त्या प्रवासाची आणि जीवनाची लालित्य राखून ठेवलेली आठवण म्हणजे 'बापाचे पाय उगवलेली माती' तील कविता आहे असे म्हणणे रास्त ठरते. ग्रामीण कथाकार म्हणून ओळख असलेल्या कवीचा हा संग्रह ग्रामीण बाज राखून वाचकांना भेटतो. संदीप गवई हे भावी पिढीतील एक विश्वासू आणि आश्वासक नाव आहे त्यांच्या भावी वाटचालीस खूप खूप शुभेच्छा!

# आळस झटकून कामाला लागा

आधुनिक केसरी

आज दैनंदिन जीवन जगत असताना माणुस आळशी बनत चालला आहे.बहुतांश बरर्याचदा हाती घेतलेले काम अर्धवट अवस्थेत सोडून देतात .आळस हा माणसाच्या जीवनात इतका सावकाश प्रयत्न करतो की दारीद्र त्याला लगेच गाठते.

जो माणूस आपल्या आयुष्यातील मौल्यवान वेळ वाया घालवतो. त्याला जीवनाचा अर्थच समजला नाही.असं चार्ल्स डार्विन म्हणतात.यशस्वी माणसे हे नेहमी अपयशातुनच शिकत असतात. तर अयशस्वी माणसे प्रयत्न थांबवल्यामुळे अपयशी होत असतात.कारण त्यांच्यात आळशी प्रवृत्ती वाढीस लागली आहे. आजचे युग हे स्पर्धेचे आहे.सगळीकडे स्पर्धा वाढली आहे. आयुष्यात ज्याला यश मिळवायचे आहे त्याने खर्या अर्थाने आळसापासून चार हात दूर राहिले पाहिजे.सतत भुतकाळ व भविष्याचा वीचार करत बसू नका.वेळेला महत्व द्या.नेपोलियन बोनापार्ट म्हणायचे ज्या दिवशी आपण थोडीसुद्धा प्रगती केली नाही तो दिवस आपण वाया घालवला असं समजायचे.

आज माणसाचे जीवन कठीण झाले आहे.प्रत्येक क्षेत्रात संघर्ष अटळ आहे.आधुनिक युगाकडे आपण वाटचाल करत असताना आपण स्वतःला बदलले पाहिजे.आपण स्पर्धेत टिकून राहण्यासाठी प्रत्येक क्षेत्रात पुढे गेले पाहिजे.आयुष्यात खचुन जाऊ नये. स्वताःला सांगा शर्यत अजुन संपली नाही कारण मी अजुन जिकंलो नाही. नशिबावर अवलंबून राहू नका. कारण नशिबावर अवलंबून राहीलो तर आपली प्रगती होणार नाही.

आपलं नशिब आपल्यालाच घडवायचे आहे.आयुष्यात कितीही लाटा येऊदेत नव्या जोमाने त्याला सामोरे जाण्याचे.प्रत्येकात काहींना काही गुण अवश्य असतात. जो माणुस स्वःताला ओळखतो तोच जीवनात यशस्वी होतो. माणसाचे अपयशाचे मुख्य कारण म्हणजे आळस होय. एक वेळ माणसाच्या जीवनात निराशा येते ह्रदयद्रावक प्रसंग येतात. आता जगण्यात काही अर्थ नाही. असे मनोमन वाटायला लागते. परंतु माणसाच्या आयुष्यातील जीवनाचा एक प्रकारे तो भागच आहे.

आपण धीराने प्रत्येक संकटाला सामोरे गेले पाहिजे.आपण जसं आहोत तसं स्वतःला स्विकारा, आपल्यातील सुप्त गुण ओळखा . संकटापासून पळू नका. कर्तृत्वाने झेप घ्या.झेप घेण्याची ताकद अंगात असली पाहिजे. अशक्यला शक्य करण्याची ताकद माणसात असली पाहिजे. त्यासाठी आळस झटकला पाहीजे.

दिवा बोलत नाही परंतू प्रकाश त्याचा परीचय करुन देत असतो. त्याचप्रमाणे माणसानेसुद्धा उत्तम कर्म व सातत्याने प्रयत्न करत राहीले तर जीवनात यशस्वी व्हायला वेळ लागणार नाही.जीवनात कीतीही निराशा आली तरी माणसाने थांबायचे नसते.अहोरात्र मेहनत घेऊन आळसाला दुर सारून पुढे जाता आले पाहिजे.

आपल्या आयुष्यात येणाऱ्या संकटापासून पळु नका, संकटांना दोष देऊ नका. कारण संकटे येत आपल्याला काहीतरी शिकवत असतात. नशिब हे कर्तुत्वामुळे घडते. गरुडाईतके उडता येत नाही म्हणून चिमणी उडायचं सोडत नाही. माणसाने सुद्धा सतत यशाचा विचार केला पाहिजे. मीसुद्धा जीवनात यशस्वी होईल . मी कोणतेही काम अर्धवट सोडून देणार नाही असं मनाला बजवा. आहे तो क्षण आनंदाने घालवा. कारण हे जीवन एकदाच आहे.

संतोष दत्तू शिंदे
मो. ७७२१०४५८४५

आपण मग आळस का अंगी बाणायचा. नेहमी मोठी स्वप्न पहा.स्वताःवर विश्वास ठेवा. जो जिवनात संघर्ष करतो तोच माणुस जीवनात यशस्वी होतो. या जगात फुकट काहीच मिळत नाहीआपल्याला हे सुंदर जीवन मिळाले आहे. मग ते आळसात का घालवायचे. खरोखर ज्याला जीवनात जर यशस्वी व्हायचे असेल तर आळस झटकून कामाला लागले पाहिजे.

# दीपावली : संस्कृतीचा अनमोल ठेवा



महादेव बी. बुरुटे
संपर्क क्र. 9765374805

आधुनिक केसरी

शारदीय नवरात्र संपतं. दसऱ्याला दसरा सण मोठा, नाही आनंदाला तोटा या हर्षोल्हासी भावनेने मोठ्या धामधुमीत सिमोल्लंघनाचा आनंद घेत सोने लुटण्याचा सोहळा संपन्न होतो. सारी सृष्टी पावसानं सचैल न्हावून फुललेली असते. हिरवागर्द शालू नेसून तरवडी, झेंडूची पिवळीधमक विविधरंगी टपोरी फुलं माळून आनंदाने डोलत असते. रब्बी पिकं शिवारी उगवत असतात. कोवळ्या कोवळ्या रोपांची लुसलुसीत हिरवी, पोपटी नाजूक, कोमल पाती नवलाईने जणू सगळीकडे टुकूटुकू बघत असतात. धरणी जणू त्यांना जोजावत असते. हळूहळू थंडीचं मंद पावली आगमन सुरू असते... आणि या साऱ्या धुंद बेधुंद वातावरणात कोजागरी पौर्णिमा रात्रभर धवल चांदण्याची उधळण करते... आणि मग वेध लागतात दिवाळीचे !

***'दिवाळी येणार अंगण सजणार***
***आनंद फुलणार घरोघरी..***
***आमच्या घरी अन तुमच्या घरी...'***

या रम्य भावनेने मन कसं अगदी मंगलमय भराऱ्या घेतं. आपल्या संस्कृतीत दिवाळीला खूप महत्व आहे. पेरण्या, शेतातले कामधंदे उरकून शेतकरी मोकळा झालेला असतो. सर्वजण दिवाळीची अतुरतेने प्रतिक्षा करीत असतात. दिवाळी म्हणजे दिव्यांच्या लावलेल्या ओळी ! जीवनातील तम, अंधःकार, निराशा नष्ट करुन रम्यतेची झगमगीत पहाट !! डोळे दिपवणारा आनंदमय उत्सव !! मनाला उत्साह, उभारी देणारा, सुखावणारा मंगलमय सण ! स्वच्छता, निटनेटकेपणा, मांगल्य आणि पावित्र्याचं प्रतिक !!

सर्वांना हव्या हव्याशा वाटणाऱ्या दीपावलीचं आगमन होतं. तनं, मनं आनंदाने फुलून येतात. सर्वत्र एक प्रकारचा उत्साह, उल्हास भरल्याची अनुभूती जाणवायला लागते. कसला हा हर्ष ? कसले हे चैतन्य ? कशाचाच बोध होत नाही; मात्र नक्षत्रांचा साज चढवून सप्त रंगात न्हालेल्या दीपावलीचं आगमन होताच

***आली माझ्या घरी ही दिवाळी***

या भावनेने अबालवृद्धांसह सर्व चराचर प्रफुल्लीत झाल्याचे जाणवते.

दिवाळीचा पहिला दिवस असतो ' वसूबारस ' दिन. या दिवशी

***दिन दिन दिवाळी, गाई, म्हशी ओवाळी***

असे म्हणत खेडोपाडी गोठ्यातल्या बळीराजाची दौलत असलेल्या पशुधनाची पणत्या, निरांजनांनी औक्षण करीत पुजा केली जाते. वातावरणात एक प्रकारचा उत्साह जाणवू लागतो. घरांघरांच्या अंगणात रंगीबेरंगी आकाशकंदील झळकू लागतात. समई, पणत्या, मेणबत्त्या वगैरेनी घरदार, अंगण, तुळशीचे कट्टे प्रकाशात न्हावून निघतात. धुवून, पुसून, सारवून स्वच्छ केलेली घरे अगदी मंगलमय भासू लागतात. आणि सहजच शब्द ओठांवर रेंगाळू लागतात,

***'लक्ष दीप हे उजळले घरी आली दिवाळी ...'***

दुसरा दिवस असतो धनत्रयोदशीचा. यम दीपदानाचा ! दक्षिणेकडे तोंड करुन दिवे लावण्याची प्रथा आहे या दिवसाची. आणि मग तिसरी पहाट उगवते ती फटाक्यांच्या आतषबाजीने ! हा दिवस म्हणजे श्रीकृष्णाने नरकासुराचा वध केल्याचा. नरकचतुर्दशीचा ! पहिल्या अभ्यंग स्नानाचा. भल्या पहाटे सर्वांनाच उठायचं असतं. सर्वजण पहाटे लवकर उठून सुगंधी उटणे लावून स्नान करतात. नवे कपडे परिधान करुन फटाक्यांच्या आतषबाजीचा मनमुराद जल्लोष लुटतात. यात घरातल्या लहानग्यांचा आनंद काय वर्णावा ! शब्दच सापडत नाहीत हा हर्ष पकडायला ! पहाट नुसती उजळून निघते. आकाशकंदील डौलाने अंगणी नयनरम्य, मंगलदायी स्नेहमय प्रकाशाची उधळण करताना हे वातावरणच असं असतं की, एखाद्या तरल मनात-

दीप उजळले नयनी माझ्या

अशा शब्दलहरी न उसळल्या तरच नवल !!

नवे कपडे, फटाक्यांचा आनंद, इतर वेळी न जाणवणारा फटाक्यांच्या धुराचा वास, लाडू, करंज्या, चकल्या, शेव, चिवडा, कडबोळी, अनारसे अशा अनेकविध फराळाच्या तृप्ततेत हा दिवस कसा संपला हे कळतच नाही मुळी !

'लक्ष्मीपुजनाचा' दिवस चौथा. अश्विन अमावस्येच्या या दिनी लक्ष्मी अर्थात घरातल्या मौल्यवान धनाची साग्रसंगीत पूजा केली जाते. घरोघरी, दारांदारांवर, वाहनांवर पिवळ्याधमक, केसरी झुबकेदार झेंडू फुलांच्या माळा, हार शोभू लागतात. प्रकाशाचा झगमगाट होतो. फटाक्यांची आतषबाजी संध्याकाळ दिपवून टाकते. चंद्राविना असलेले चांदणे अधिकच खुलते. स्वच्छ, निरभ्र आकाशात चमचमणाऱ्या तारका आणि धरणीवरल्या फटाक्यांची आतषबाजी पाहून वाटते जणू स्पर्धाच सुरु आहे त्यांच्यात ! या नयनरम्य वातावरणात दिवाळीची खरी आरास मनात घर करते आणि ह्रदयात एक अनामिक आनंदलहर उसळते. लक्ष लक्ष दीप डोळ्यांचे पारणे फेडतात.

कार्तिक शुध्द एक. हा दिवाळी पाडव्याचा अर्थात बलीप्रतिपदेचा दिवस ! या शुभ दिनी व्यापारी नववर्षाची सुरुवात होते. घरातील सर्वांना पंचारतीने ओवाळले जाते. मंगल वाद्ये वाजवली जातात. या दिनी नववर्षाच्या शुभेच्छा दिल्या-घेतल्या जातात.

***'गेला दसरा, आली दिवाळी***
***हसू नाचू या हो,***
***नवीन हे, वर्ष सुखाचे जावो....'***

असे वातावरण सर्वत्र अनुभवायला मिळते. खेडोपाडी घराघरांच्या अंगणात दिवाळीच्या या पाचही दिवशी गाईच्या शेणाच्या लहान लहान बाहुलींच्या आकाराच्या गौळणी घातलेल्या असायच्या. घरासमोरचे अंगण सारवून त्यावर वेगवेगळ्या दिवशी वेगवेगळी मांडणी आमची आजी करायची. पहिल्या दिवशी पाच गौळणी, बळीराम असायचा. गौळणींच्या डोकीवर शेणाचीच पाटी ठेवलेली असे. त्यात ताक, दही ओतलेले असायचे. दोन गौळणी बळीरामाचे अंग चोळत असत. बळीराम आडवा झोपलेला असे. पाच दिवस कधी डोंगर, डोंगरावर चढणारी माणसं, गौळणींची मुलं यांची मांडणी करत वेगवेगळ्या गोष्टी, अख्यायिका आजी सांगायची. ऐकून त्या त्या कथांविषयी खूप आदरभाव वाटायचा. या



पाचही दिवशी घरात केलेल्या फराळाच्या नैवद्याने त्यांची पुजा करुनच घरातील महिला फराळ करीत. पाचव्या दिवसाची अख्यायिका तर मनात घर करुन आजही आहे. त्या दिवशी पांडव अज्ञातवासाला निघालेले असतात. त्या दिवशी पांडव व त्यांचा गोतावळा मिळून पंधरा वीस बाहुल्या केलेल्या असत. प्रत्येकाच्या डोईवर त्यांचे त्यांचे ओझे दिलेले असे. नवीन कपडे म्हणून प्रत्येकाला गळ्याभोवती कापूस गुंडाळलेला असे. गुलाल लावलेला असे. ते वनवासाला निघालेले असल्याने त्यांना त्या दिवशी जेवणाचा बेत असे. रानातील बाजरीच्या ओल्या पेंडीभर ताटांची ती ताटे वरच्या बाजूला बांधून खालचा भाग पसरुन उभी करत खोप ( सावली ) करुन त्या खोपीमध्ये पेटलेल्या विस्तवावर भात किंवा गव्हाच्या शेवयांचा नैवद्य शिजवला जाई. विस्तवावर ठेवलेल्या छोट्या पातेल्यातील पाणी जिकडे उतु जाईल त्या दिशेला त्या वर्षी चांगले पीकपाणी येणार असा कयास केला जाई. नंतर त्या नैवद्याने व घरातील गोड पदार्थांनी पुजा करुन " पुढल्या वर्षी सुखरुप या " असा निरोप देताना आम्हाला खूप भरुन आल्यासारखे होई. आम्ही सकाळ पासून आता हे बिचारे वनवासाला जाणार म्हणून तिथेच घुटमळत असू. नंतर मुर्तींचं विसर्जन केले जाई. म्हणजे हे पांडव शेतात नेऊन वाळायला ठेवले जात. हा प्रसंग मन भारावून टाकतो. इतका भावस्पर्शी असतो हा प्रसंग की, शब्दांत मांडता येणे कठीण आहे. तो अनुभवानेच अनुभवायला हवा असा असतो. अंतःकरणात एक प्रकारची हुरहूर लागून राहते.

तेंव्हा आकाशकंदीलही आम्ही मुले घरीच बनवायचो. खरं तर हे काम आम्ही आमच्याच आवडीने करायचो. पण उगाचच ते काम घरच्या मोठ्या माणसानी आपल्याला लावले आहे या अविर्भावात आम्ही त्यांच्यावर डाफरायचो. तीही मुकाट ऐकायची. ती मजा काही औरच असायची. वेळूच्या लाकडाच्या कांब्या काढणे, त्या तासून, घासून प्रमाणात कापून, खाचा पाडून, जाड दोऱ्याने बांधून, सांगाडा तयार झाला की मग त्यावर गव्हाच्या पिठाची खळ करुन पातळ रंगीबेरंगी चिटाचे कागद कापून ते चिकटवायचे. त्याच कागदाच्या झुरमुळ्या कापून खाली लावून नक्षीदार पट्ट्या प्रत्येक जोडावर चिकटवून केलेला हा आकाश दिवा संध्याकाळी अंगणात उंच रोवलेल्या बांबूला त्याला लावलेल्या कप्पीवरुन वर नेणे ही एक कसरतच असे. आत तेलाची पणती ठेवलेला हा आकाशकंदील खूप जपून वर न्यावा लागे. त्यावेळी मोठी माणसे मदत करत. अंधारात तो खूप सुंदर दिसे. तो स्नेहमय प्रकाश बघून दिवसभर केलेल्या कष्टाचे सार्थक आणि समाधान वाटे.

आणि मग दीपावली पाडव्याच्या दुसऱ्या दिवशी येते भाऊबीज ! बहीण भावाच्या अतुट, अमर प्रेमाची प्रचिती देणारा हा दिवस ! कुंवारीण किंवा माहेरवाशीण बहीण आपल्या लाडक्या भावाला पंचनिरांजनांनी भरल्या मनाने ओवाळत औक्षण करताना जणू तिच्या मुखी शब्द असतात,-

***'सोनियाच्या ताटी, उजळल्या ज्योती***
***ओवाळीते भाऊ राया रे***
***वेड्या बहीणीची रे वेडी माया.....'***

अशा या प्रेममय वात्सल्याच्या शब्दांनी दिवाळी संपते. मनात हुरहूर दाटते. पण मनच मनाला दिलासा देते कारण पुढच्या वर्षी ती पुन्हा येणारच असते. अशी ही संस्कृतीचे धागे जोडणारी, विविध कथा प्रसंगानी मंगलमय होत आनंदी चैतन्याचे शिडकावे देणारी आपल्या संस्कृतीचा अनमोल ठेवा असलेली दीपावली !!...

अशी ही वीस पंचवीस वर्षांपूर्वीची दिवाळी. आजही दिवाळी मोठ्या उत्साहात साजरी होते. पण पुर्वीचा थ्रील आज जाणवत नाही. आता कोणत्याही प्रसंगाला कानठळ्या बसवणारे ढीगभर फटाके फोडले जातात; परिणामी तेंव्हाच्या मंगलमय आतषबाजीची अप्रुपता आता जाणवत नाही.

त्यावेळी आम्ही वर्षभर दिवाळीत फटाके घेण्यासाठी म्हणून रुपया-दिड रुपया साठवून ठेवून दिवाळीत त्यातून पाचसहा टिकल्यांच्या डब्या, एखाद-दुसरी छोट्या लवंगी फटाक्यांची माळ घेत असू. घरातील मोठे लोक दिवाळीचे सामान खरेदी करायला गेले की वाणी एक-दोन लवंगी फटाक्यांची छोटी खोकी देत. पण हे मोठे लोक एखादाच नाखुषीने घेत. नंतर आम्हाला एकेक माळ वाटून देत. हे फटाके आमचा खजीना असे. तो आम्ही पाच दिवस पुरवून वापरत. आजीने अंगणात घातलेल्या बळीरामाच्या अंगात एखादा लवंगी फटाका लावून उदबत्तीने पेटवला की तो बळीराम व काही गौळणींच्या ठिकऱ्या ठिकऱ्या होत. खूप मजा यायची. एखाद्या कडे टिकल्या फोडायचे पिस्तुल आणि टिकल्यांच्या पिस्तुलासाठी असणाऱ्या माळा असल्या की त्याचा खूप हेवा वाटायचा. आम्ही एक दगड खाली ठेऊन त्यावर टिकली ठेऊन दुसऱ्या दगडाने आघात करुन टिकली फोडत असे.


आम्हा भावंडांच्या जागा आणि दगड हे पाच दिवस ठरलेले असत. हे सारे नजरेसमोर तरळले की ' रम्य ते बालपण ' ची प्रकर्षाने प्रचिती येते. आजच्या झगमगीत लाईटींगच्या गदारोळात स्निग्ध, स्नेहल प्रकाश लोप झाल्यासारखे वाटते. आता युज अँड थ्रो च्या जमान्यात पुर्वीसारखे आकाशकंदीलही घरी कोणी करत नाही. बाजारात मिळणारे प्लॅस्टीकचे दिवे आणून त्यात वीजेचा बल्ब टाकून उंच ठिकाणी लावला की दहा बारा दिवसांनी काढून फेकला जातो. हे अगदी निर्जिव पणे केले जाते. आता फराळाच्या निर्मितीची घरातील लगबग आणि धावपळही खूप कमी झाली असून नाविन्यही जाणवत नाही. कारण आता तयार फराळ वर्षभर सहजपणे मिळतो. त्यामुळे खाण्याची मुळ मजा, गोडी न येता यांत्रीक पणे खाल्ले जाते. आणि बरंच काही बदलले आहे. असो. आधुनिक जगाबरोबर चालणं क्रमप्राप्तच आहे. पुर्वीचे दिवस अजुनही मनात कुठेतरी रुंजी घालतात हे मात्र खरं ! कितीही बदल झाले तरी दिवाळी मागच्या संकल्पना अबाधीत राहणार आहेत. हे सत्य आहे.

# भारतीय शहीद पोलिस स्मृती दिन

आधुनिक केसरी

किशोर सांगळे
मो. 7385945956

आज 21 ऑक्टोबर हा दिवस म्हणजे पोलिस स्मृती दिन. पोलीस कर्मचाऱ्यांची निष्ठा, सर्वोच्च बलिदानाचा सन्मान करण्यासाठी तसेच शहीद पोलिसांच्या शौर्यापासून इतरांना प्रेरणा मिळावी, कर्तव्याची आणि राष्ट्रनिष्ठेची जाणीव व्हावी म्हणून 'पोलिस स्मृती दिन' साजरा करण्याची रीत आहे. 21ऑक्टोबर 1959 रोजी लडाख सीमेवर 18 हजार फूट उंचीवर पोलीस कर्मचारी गस्त घालत असताना शत्रूकडून झालेल्या हल्ल्यात 10 कर्मचारी हुतात्मा झाले तर 9 जखमी झाले होते. त्याची आठवण म्हणून भारतामध्ये 21 ऑक्टोबर हा दिवस पोलीस स्मृतिदिन पाळला जातो. वर्षभरात जे जवान देशात आणि राज्यात शहीद झाले अशा जवानांना या 21 ऑक्टोबर रोजी श्रद्धांजली वाहण्यात येते. जिल्ह्याच्या मुख्यालयात या निमित्ताने शहीद पोलिसांना अभिवादन केले जाते. तसेच विविध उपक्रमाचे आयोजनही केले जाते.का साजरा केला जातो हा दिवस.21 ऑक्टोबर 1959 रोजी लडाखमधील भारताच्या सीमेवर बर्फाच्छादित व निर्जन ठिकाणी केंद्रीय राखीव पोलीस दलातील 10 जवान गस्त घालत होते. यावेळी दबा धरून बसलेल्या चिनी सैनिकांनी केलेल्या हल्ल्यात दहा जणांना वीरगती प्राप्त झाली होती. या घटनेने देशात दुःखाची लहर पसरली होती. वीर जवानांनी दाखवलेल्या या अतुलनीय शौर्यापासून इतरांना स्फूर्ती मिळावी, तसेच आपल्या कर्तव्याची व राष्ट्रनिष्ठेची जाणीव व्हावी म्हणून शहीद जवानांच्या स्मृतिप्रीत्यर्थ 21ऑक्टोबर




हा दिवस संपूर्ण देशात पोलीस हुतात्मा दिन म्हणून पाळला जातो.2018 मध्ये,पोलिस स्मृतिदिनानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नवी दिल्लीमध्ये पहिल्याच राष्ट्रीय पोलिस स्मारकाचे उद्घाटन केले.त्यांनी पोलिस दलांना आणि त्यांच्या कुटुंबियांना अभिवादन केले आणि देशातील लोकांना पोलिस म्यूझियम भेट देण्याचे आवाहन केले.राष्ट्रीय पोलिस मेमोरियलने 1947 नंतरपासून आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या सर्व केंद्रीय आणि राज्य पोलिस दलाच्या 34,844 पोलिस कर्मचाऱ्यांचे स्मरण केले.

# बोधकथा

आधुनिक केसरी

एका माणसाने त्याच्या घरी एक पोपट पाळला होता. पिंजऱ्यात ठेवलेल्या पोपटाला चांगले खायला प्यायला मिळत असे व पोपट बोलका असल्याने घरातील लोकांकडून त्याचे फार कौतुकही केले जाई. पण पोपटाच्या मनात मात्र पारतंत्र्याचे शल्य दाटून येई.

अखेर एकेदिवशी पोपटाला संधी चालून आली. त्या माणसाने पोपटाला खाणे देण्यासाठी पिंजऱ्याचे दार उघडले होते व त्याच्या हातून ते तसेच उघडे राहिले होते. माणसाला अचानक काही काम आल्याने तो ते दार उघडे टाकून निघून गेला असता पोपट पिंजऱ्यातून बाहेर निघून गेला. पण लहानपणापासूनच पिंजऱ्यात राहिला असल्याने त्याला फारसे नीट उडताच येत नव्हते. एका झाडावर गेला असता त्याला इतर पोपटांशी बोलता येईना कारण लहानपणापासूनच तो परकी भाषा शिकत असल्याने त्याला पोपटांची भाषा येत नव्हती म्हणून इतर पोपटही त्याला सहकारी मानत नव्हते. पिंजऱ्यात आयते खायची सवय असल्याने त्याला अन्न मिळवणे अवघड जाऊ लागले व ऊन, वारा, पाऊस यांची कधीच सवय नसल्याने तो आजारी पडला व मरून गेला.

**तात्पर्य : जास्त काळ पारतंत्र्यात(गुलामगिरीत) राहिल्याने तशीच गुलामगिरीची सवय अंगात मुरुन राहते. मग परक्याची भाषा, संस्कृतीच आपली वाटू लागते आणि मिळालेले स्वापतंत्र्य टिकवण्याहसाठीची जिद्द अंगी राहत नाही. परक्या संस्कृतीचे चांगले काही घेताना आपल्या संस्कृतीचे विस्मरण होऊ न देणे हाच खरा शहाणपणा.**



# आमदाबाद स्मशानभूमीच्या कामाला मुहूर्त मिळणार कधी ?

## मृत वृद्धेला अग्निदाह देताच नदीला आला पूर : स्मशानभूमी नसल्याने मृतदेहाची दैना

आधुनिक केसरी न्यूज

**पिशोर:** तालुक्यातील आमदाबाद येथे स्मशानभूमीच नसल्याने कुटुंबीयांना अडचणींचा सामना करावा लागला आहे. यामुळे मरणाने केली सुटका अन् पुराने केली दैना, अशीच काहीशी अवस्था या मृतदेहाची झाली. आमदाबाद गावाच्या नदीकाठी अंत्यविधी उरकण्याचे नियोजन सुरू होते. त्यासाठी नदीकाठी ट्रॅक्टरने जागा तयार करून सरणासाठी पुरेशी लाकडे व टायर रचून अग्निदाह देण्यात आला. मात्र, याचवेळी नदीच्या वरील भागात जोरदार पाऊस झाल्याने नदीला पूर आला. हे लक्षात येताच बनकर कुटुंबातील सदस्यांनी सरण मंदगतीने जळू नये म्हणून विविध उपाययोजना केल्या. मात्र, कुटुंबातील सदस्यांनी पुराच्या पाण्यात



अक्षरशः जीव धोक्यात घालून आग विझणार नाही यासाठी जीवपाड धडपड केली. कन्नड तालुक्यातील आमदाबाद येथे मंगळवारी रात्री एका वृद्धेचे दीर्घ आजाराने निधन झाले. त्यानंतर बुधवारी या महिलेवर स्मशानभूमी नसल्याने अंजना नदीपात्रात अंत्यविधी पार पडला. मात्र, अग्निदाह देताच जोरदार झालेल्या पावसामुळे नदीला पूर आला. यामुळे जोरदार वाहणाऱ्या पाण्यात मृतदेहाची हेळसांड झाली. शांताबाई गोटीराम बनकर (वय ८२) असे मृत वृद्धेचे नाव आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, सदर वृद्धेचे मंगळवारी रात्री दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्यावर बुधवारी सकाळी दहाच्या सुमारास येथील अंजना नदीपात्रात अंत्यविधीसाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. अखेर तळाशी राहिलेले लाकडे जळत असताना पूर अचानक वाढला. त्यामुळे नातेवाइकांची एकच तारांबळ उडाली होती. अग्नी दिलेल्या खालील भागाचे सरण विझून वाहून गेले. येथे स्मशानभूमी असती मृतदेहाची हेळसांड झाली नसती अशी माहिती समोरा येत आहे. दरम्यान नदीकाठी जूनी स्मशानभूमी असून दोन वर्षापूर्वी नदीला मोठा पूर आल्याने तेथील नदीकाठचा भाग खचल्याने रस्ता वाहून गेला. त्या ठिकाणी जाण्यासाठी रस्ता नाही. ग्रामपंचायतीने जुन्या स्मशानभूमीसाठी नवीन रस्ता व संरक्षक भिंत करून द्यावी, अशी मागणी सर्व गावकऱ्यांच्या वतीने करण्यात आली आहे. याआधी गावची समस्या लोकप्रतिनिधी मांडताच आ. उदयसिंग राजपूत नवीन स्मशानभूमीसाठी पाच लाखांचा निधी मंजूर केला आहे. परंतु जागेअभावी हे काम रखडलेले आहे, बुधवारी घडलेली घटना अक्षरशा अंगला काटा नारी आहे, या ठिकाणी कमित कमी स्मशान भूमिचा पत्राशेड ही असता तर इतकी दैना झाली नसती, या ठिकाणी तातडीने स्मशानभूमीचे काम करावे अशी मागणी होत आहे.

# समृद्धी महामार्गाच्या बाजूने रस्ता द्या

## हडस पिंपळगाव येथील शेतकऱ्यांचे निवेदन



आधुनिक केसरी न्यूज

**लासूरगाव :** औरंगाबाद जिल्ह्यामधून जात असलेले स्व. बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्ग मुळे हडस पिंपळगाव येथील समृद्धी महामार्गच्या एका बाजु कडुन दुसऱ्या बाजुला जाणारा रस्ता ठेकेदार कंपनीने बंद केल्याने हडस पिंपळगाव येथील शेतकऱ्यांना आपल्या शेतात जाण्यासाठी पर्यायी देण्याची मागणी हडस पिंपळगाव येथील शेतकऱ्यांनी वैजापुरचे उपविभागिय अधिकारी यांच्याकडे केली आहे.

हडस पिंपळगाव येथील विविध गटातून समृद्धी महामार्ग गेलेला आहे, मात्र हडस पिंपळगाव येथील शेतकऱ्यांचे अर्ध आधिक शेती समृद्धी महामार्ग च्या दुसऱ्या बाजुला असल्याने त्या शेतात जाण्यासाठी शेतकऱ्यांना जाण्यासाठी कोणाताही पर्यायी व्यवस्था न करता तसेच शेतकऱ्यांचे रस्ते ठेकेदार बंद करत असल्याने शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी मोठी अडचण निर्मान होणार आहे, हडस पिंपळगाव येथील शेतकऱ्यांनी सदरील काम बंद पाडले. मात्र कंरजगाव व हडस पिंपळगाव येथील शेतकऱ्यांनी आक्रमक प्रविज्ञा घेतल्याने सदरील काम बंद करत शेतकऱ्यांचा पर्यायी रस्ताची व्यवस्था केल्यावर रस्ते बंद करणार असल्याच सांगत तात्पुरत काम बंद केले होते मात्र ठेकेदार पोलिस संरक्षण सोबत आणत शेतकऱ्यांना दमदाठी करत रस्ता बंद केला. समृद्धी महामार्ग लवकरच वाहतुकीसाठी खुला करण्यात येणार असुन मार्गची बांधकाम करणाऱ्या कंपनीने आजू बाजूचे सर्व रस्ते बंद करत आहे, मात्र एका बाजूकडुन दुसऱ्या बाजुला जाण्यासाठी कोणतेही पर्यायी रस्ते न ठेवल्याने शेतकऱ्याचे मका, बाजरी, कापणीला आलेले तसेच कापुस वेचणी सुरु झालेली आहे, मात्र रस्ताच नसल्याने सर्व पिक शेतात उभे आहेत ज्वारी हरभरा, पेरणी, कांदा लागवड ही कामे ठप्प झालेली आहे. अडचण निर्मान होत झाली आहे. काम सुरु असताना ठेकेदाराना शेतकऱ्यांना साईड रस्ते होणार असल्याचे तोंडी सांगितले तसेच सर्व काम होई पर्यत रस्ते सुरु ठेवले होते, मात्र आता सर्व काम संपल्याने रस्ते देखील बंद केल्याने कंपनी व प्रशासनाने शेतकऱ्यांची फसवणूक केली असल्याचा अरोप केला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना रस्ता चालु करुन द्यावा किंवा पर्यार्यी रस्ता उपलब्धा करुन देण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. निवेदनावर संजय निघोटे, काका निघोटे, विष्णू निघोटे, अण्णासाहेब निघोटे, हरीभाउ निघोटे, दतू निघोटे, सोपिन गाजरे, सोपान निघोटे, गणेश डगळे, बाबासाहेब निघोटे, शरद निघोटे, सचिन निघोटे, ज्ञानेश्वर निघोटे, मनोज निघोटे, गणेश निघोटे, राजु निघोटे, कल्यान निघोटे, बाळु निघोटे, अगय गाजरे, सुनिल निघोटे, गणेश निघोटे, आणिल निघोटे,राजु देवकर, देविदास दिवेकर, अशोक नांगरे, सोनाजी डुकरे आदींच्या सह्या आहेत.



# आईस्क्रिम पार्लरला आग; ४० लाखांचे नुकसान

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** साक्री रोडवरील कुमार नगरात असलेल्या जस्ट चील आईस्क्रीम पार्लरला पहाटे 5 च्या सुमारास भीषण आग लागली या आगीत दुकान सहित गोडाऊन खास झाले आहे आगीचं कारण शॉर्टसर्किटमुळे झाल्याचे सांगण्यात येत आहे आग एवढी भयानक पसरली की दुकान व गोडाऊन चे सर्व फ्रिजर चे सिलेंडर स्पोर्ट होऊन सर्व काम झाले या आगीत तब्बल 40 ते 50 लाखाचे नुकसान झाल्याची माहिती दुकान मालक अग्रवाल यांनी दिली. दरम्यान, या घटनेची माहिती मिळताच अग्निशमन आणल दल घटनास्थळी दाखल झाले . त्यांनी आग आटोक परंतु , तोपर्यंत संपूर्ण दुकानातील वस्तू जळून खाक झाल्या होत्या यावेळी वीज कंपनीचे कर्मचारीही तातडीने दाखल झाले होते . तर धुळे व्यापारी महासंघाचे अध्यक्ष नितीन बंग यांनीही घटनास्थळी भेट देवून पहाणी केली .

# शिंदाड येथील शेतमजुराची गळफास लावून आत्महत्या

आधुनिक केसरी न्यूज

**पाचोरा :** तालुक्यातील शिंदाड येथे एका 43 वर्षीय शेतमजुरांनी आपल्या राहत्या घराच्या छताला गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना दि.19 ऑक्टोंबर रोजी पहाटेच्या सुमारास उघडकीस आली घटने प्रकरणी पिंपळगाव पोलीस स्टेशन पोलीस स्टेशन मध्ये आकाशमात महत्त्वाची नोंद करण्यात आली आहे याबाबत सविस्तर वृत्त असे की शिंदाडता पाचोरा येथील रहिवासी विलास गुलाब तडवी वय 43 हे आपली वृद्ध आई पत्नी व दोन मुलांच्या उदरनिर्वाह शेतमजुरी करून चालवीत होते दिवसा दिवस वाढणारी महागाई व हाताला काम नसल्याने



आर्थिक विवंचनेतून विलास गुलाब तडवी यांनी दि. 19. ऑक्टोंबर रोजी घरात कोणीही नसताना घराच्या छताला गडपास लावत आपली जीवन यात्रा संपवली सदरचा प्रकार गावातच राहणारे विलास तडवी यांचे पुतणे मुकेश तडवी यांच्या लक्षात येताच त्यांनी ग्रामस्थांच्या मदतीने विलास तडवी यांना पाचोरा ग्रामीण रुग्णालयात दाखल केले असता वैद्यकीय अधिकारी डॉक्टर अमित साळुंखे यांनी विलास तडवी यास मृत्यू घोषित करत घटनेप्रकारे पिंपळगाव हरेश्वर पोलीस स्टेशनमध्ये आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून घटनेचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक महेंद्र वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक फौजदार आर के पाटील हे करीत आहेत. मयत विलास तडवी यांचे पश्चात वृद्ध आई पत्नी व दोन मुले असा परिवार असून त्यांच्या आकस्मात मृत्यूचे परिसरात शोकाकुल पसरली आहे.

आरोग्याकडे दुर्लक्ष करू नका
आरोग्य हीच संपत्ती आहे
शहरातील एक विश्वसनीय सुपर मार्केट
महावीर
घर संसार

● घाऊक आणि किरकोळ ● किराणा, सुका मेवा, मसाले
● क्रॉकरी, घरगुती उपकरणे ● घर साफ करणारे साहित्य, स्टील आणि अ‍ॅल्युमिनियम
● प्लास्टिकच्या वस्तू आणि बरेच काही
सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअप ऑर्डर आणि कोणतीही ऑर्डर 9850017181
वितरण स्थिती 9021395308 9657398232
घाऊक चौकशी 7620111118 9527111185
www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com
S.p. रोड, चेलीपुरा, शहागंज, औरंगाबाद
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर MIDC चिकलठाणा, औरंगाबाद

# अण्णासाहेब पाटील महामंडळाच्या व्याज परतावा योजनेची मर्यादा १५ लाख

## महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांची माहिती

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजनेची मर्यादा १० लाखावरून १५ लाख करण्यात आल्याची माहिती या महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांनी गुरुवारी पत्रकार परिषदेत दिली. भारतीय जनता पार्टी प्रदेश कार्यालयात झालेल्या या पत्रकार परिषदेला प्रदेश मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये उपस्थित होते. वैयक्तिक कर्ज परतावा योजनेंतर्गत वयोमर्यादेची अट ६० पर्यंत वाढविण्यात आल्याची माहितीही श्री.पाटील यांनी दिली.

पाटील म्हणाले की, महामंडळाच्या अध्यक्ष पदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर लगेचच पहिल्या दिवशी राज्यातील ३ हजार ७२७ लाभार्थ्यांना २ कोटी ९७ लाख एवढा व्याज परतावा वितरीत केला आहे. महामंडळातर्फे व्याज परतावा योजनेची मर्यादा १० लाख होती. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ही मर्यादा १५ लाख रु. पर्यंत वाढविली आहे. त्याचबरोबर सीसी आणि ओडी कर्जांतर्गतचा व्याज परतावा पुन्हा सुरु करण्यात आला आहे.

देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना महामंडळाच्या माध्यमातून दिल्या जाणाऱ्या कर्जांना राज्य सरकारतर्फे हमी देण्याचा निर्णय झाला होता. मात्र महाविकास आघाडी सरकारने हा निर्णय रद्द केला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सत्तेत आल्या-आल्या ही हमी पुन्हा देण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाचा मराठा समाजातील तरुणांना मोठा फायदा होणार आहे. असेही श्री.पाटील यांनी नमूद केले. महामंडळाच्या कर्ज योजनातून एक लाख मराठा उद्योजक तयार करू असे सांगून श्री.पाटील म्हणाले की, शिंदे फडणवीस सरकारने सत्तेवर आल्यानंतर मराठा समाजाच्या हिताचे अनेक निर्णय घेतले आहेत. सारथी आणि महाज्योती महामंडळांच्या माध्यमातून मराठा समाजातील विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक जिल्ह्यात शंभर विद्यार्थी क्षमतेचे वसतिगृह उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार नाशिक येथे मुलींचे वसतिगृह सुरु करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

# जिजामाता परिवाराकडून मदतीचा हात

आधुनिक केसरी न्यूज



**कन्नड :** जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळ परिवार व संस्थेचे सचिव सागर जाधव यांच्या वतीने जिजामाता परिवारा मार्फत दिवाळी निमित्त मिठाईवाटप व फटाक्यावरील खर्च न करता दिवाळी सण अत्यंत साध्या पद्धतीने साजरा करण्याचा संकल्प करत स्वर्गीय श्रद्धा पिंपळे हिच्या परिवाराच्या दुःखात सहभागी होत परिवारास संस्थेच्या वतीने 21 हजार रुपयांचा मदतीचा हात देण्यात आला. पाणपोई फाटा येथे अपघात स्वर्गीय श्रद्धा पिंपळे ही संस्थेच्या छत्रपती शिवाजी माध्यमिक विद्यालय बनशेंद्रा येथे वर्ग सातवी या वर्गात शिक्षण घेत होती मात्र तिचा दिनांक 23 सप्टेंबर रोजी बहिरगाव डोणगाव फाट्याजवळ पाणपोई या ठिकाणी ट्रॅक्टर अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला तिच्या घरची परिस्थिती अत्यंत बेताची व हलाखीची आहे हे लक्षात घेऊन संस्थेचे सचिव सागर जाधव व जिजामाता शिक्षक परिवाराच्या वतीने दिवाळी सण हा अत्यंत साध्या पद्धतीने साजरा करण्याचा संकल्प करत त्या परिवाराच्या दुःखात सहभागी होत मृत्युपश्चात कुटुंबीयांना मदतीचा हात सामाजिक उत्तरदायित्वाच्या भूमिकेतून एक सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळ परिवाराकडून मदतीचा हात देण्यात आला.

# मायमराठी राज्य अध्यापक संघ पुणे यांच्या वतीने डॉ. संदीप तुपे, सुनील भडके यांचा सत्कार



आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** विद्येचे माहेरघर पुणे येथे माय मराठी 'राज्य अध्यापक संघाचा' प्रथम वर्धापन दिन सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या तसेच कोविड काळात उत्कृष्ट आनलाईन पाठ घेणाऱ्या महाराष्ट्रातील गुणवंत, ज्ञानवंत शिक्षकांचा सोहळ्या दरम्यान गौरव करण्यात आला. याप्रसंगी मराठी भाषा विषय तज्ज्ञ, डा. संदीप तुपे, शिवाजी हायस्कूल,खोकडपुरा. औरंगाबाद सुनिल भडके, ज्ञानेश्वर विद्यालय, बेगमपुरा. औरंगाबाद, सुभाष देशमुख सरस्वती भुवन सेंटनरी स्कूल, औरंगाबाद यांचा शाल, श्रीफळ, प्रमाणपत्र, पुष्प देऊन सन्मानीत करण्यात आले. याप्रसंगी बालभारतीचे संचालक कृष्णकांत पाटील सर, महाराष्ट्र माध्यमिक शिक्षण मंडळ पुणेचे सचिव आ.डॉ. अशोक भोसले सर, ज्ञान प्रबोधिनीचे समन्वयक मा. प्रशांतजी दिवेकर राज्य अध्यापक संघाचे संस्थापक विश्वस्त हनुमंत कुबडे, अध्यक्ष प्राचार्य श्री लक्ष्मण महाडिक, कार्याध्यक्ष द्वारकानाथ जोशी यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी राज्य अध्यापक संघाद्वारे विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी केले गेलेले विशेष प्रयत्न आणि संघाची आगामी वाटचाल आणि भूमिका या संदर्भात राज्य अध्यापक संघाचे विश्वस्त आ. हनुमंतजी कुबडे ( अण्णा ) सर यांनी प्रास्ताविक केले. वाचन कौशल्य विकसन आणि शिक्षकांची भूमिका' या विषयावर ज्ञानप्रबोधिनीचे समन्वयक आ. प्रशांतजी दिवेकर सर यांनी सखोल मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांवर संस्कार करणारा मराठी विषयाचा शिक्षक हा शिक्षण प्रणालीतला सर्वात मोठा घटक आहे असे भाष्य महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाचे सचिव डॉ.अशोक भोसले सर यांनी मनोगतात केले. भाषेचे संवर्धन व्हायचे तर सामाजिक व्यवहाराच्या सर्व क्षेत्रांत तिचा प्रवेश व्हायला हवा, असे भाष्य करीत बालभारतीचे संचालक मा. कृष्णकांत पाटील सर यांनी उपस्थित शिक्षकांशी संवाद साधला. अध्यक्षीय समारोपात राज्य अध्यापक संघाचे अध्यक्ष सुप्रसिद्ध साहित्यिक प्राचार्य लक्ष्मण महाडिक सर यांनी शिक्षकांना मार्गदर्शन केले. यावेळी महाराष्ट्रातील जिल्ह्यांच्या कार्यकारणीचे अध्यक्ष व सचिव यांचाही प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे संचलन आ. प्रज्ञाताई देशपांडे मडम यांनी केले तर आभार संघाचे उपाध्यक्ष नाना शिवले सर यांनी मानले. रुचकर स्नेह भोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली. या सोहळ्यासाठी राज्य अध्यापक संघाचे उपाध्यक्ष अशोक तकटे, नाना शिवले रमाकांत देशपांडे, ज्ञानदेव दहिफळे, राज्य संघटक सारंग पाटील, यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी माय मराठीवर प्रेम करणारे राज्यभरातील राज्य संघ कार्यकारिणीतील सर्व पदाधिकारी, सदस्य व शिक्षकांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

# श्रावणबाळ, वृद्धापकाळ, संजय गांधी निराधार योजनेच्या पात्र लाभार्थींची दिवाळी गोड

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यात व सावळदबारा परिसरातील संजय गांधी, श्रावणबाळ, वृद्धापकाळ, विधवा महिला, अपंग व परित्याक्त्या आदी योजनेचे पात्र लाभार्थ्यांची तीन हजार रुपये दि.१९/१०/२२बुधवार रोजी टाकून तहसीलदार रमेश जसवंत सोयगाव यांनी दिवाळी गोड केली असून वाटप हि आजच करण्यात आली आहे. संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ, वृद्धापकाळ, विधवा, अपंग व परित्याक्त्या आदी योजनांमार्फत सरकारी पातळीवर गोरगरीब व गरजूंना एक हजाराचे दरमहा वेतन दिले जाते. मात्र या विविध योजनांचे अनुदान सरकारी पातळीवरून दोन महिन्यापासून न आल्याने तालुक्यातील या सर्व या योजनामार्फत सुमारे १२ हजाराहून अधिक गरजू लाभार्थी वंचीत होते परंतु दिवाळी पाच दिवशावर येऊन टेकल्याने तहसीलदार रमेश जसवंत यांनी तात्काळ योजेनेचे लाभार्थी यांची दिवाळी गोड केली आहे. आणि लगेच आजपासून वाटप सुरू करण्यात आले आहे. अशे आदेश शुद्धा मा.तहसीलदार रमेश जसवंत सोयगाव यांनी बँकांना दिले आहे.सदरील आदेशाचे अमंलबजावणी त्वरित करून काही लाभार्थ्यांना मध्यवर्ती सहकार बँकेचे कर्मचारी नामदेव चव्हाण, रोकडेसाहब,रत्नाकर उमरे तात्काळ वाटप सुरू करण्यात आली आहे.सोयगाव तालुक्यात सर्वाधिक लाभार्थी बारा हजार तालुक्यात आहेत. या योजनाखाली गरजूंना प्रत्येकी प्रती महिना एक हजार रूपये प्रमाणे तीन महिन्यांचे तीन त्यांच्या बँक खात्यात जमा केले जातात. आता संजय गांधी निराधार योजना तसेच श्रावणबाळ, विधवा, अपंग परित्यक्ता या योजनेमार्फत लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यांना गेली अनेक वर्षापासून एक हजार रूपये प्रत्येक महिन्याकाठी मिळत असतात व तेही थेट त्यांच्या बँक खात्यावर आम्ही जमा करतो अशी माहिती मा.तहसीलदार रमेश जसवंत सोयगाव यांनी बोलताना सांगितले.



# श्रद्धाताईला मिळणार का न्याय?

## श्रद्धाच्या मृत्यूस जबाबदारांची चौकशी करून दंडात्मक कारवाही करावी : उपविभागीय अधिकारी जनार्दन विधाते

आधुनिक केसरी न्यूज



**कन्नड :** बहिरगाव फाटा कमानी जवळील अवैध गौणखनिज उपसा व वाहतूक करण्याऱ्या वाहन चालकाकडून निष्काळजी पणे वाहन चालविल्याने ट्रॅक्टरच्या धडकेत शाळकरी आदिवासी भिल्ल समाजाच्या श्रध्दा या मुलीच्या मृत्यु प्रकरणी या ठिकाणावरुन अवैध गौणखनिज उपसा व तस्करी करणारे तस्कर, जे.सी.बीचे चालक मालक, वाहतुक करणारे ट्रॅक्टर चालक, मालक तसेच जागा मालकावर अपघाता बरोबर सदोष मनुष्यवध व गौणखनिज तस्करी चा गुन्हा दाखल करा असे निवेदन उपविभागीय अधिकारी जनार्दन विधाते यांना देण्यात आले होते.

त्या अनुषंगाने या निवेदनाची दखल घेऊन उपविभागीय अधिकारी जनार्दन विधाते यांनी श्रद्धाच्या मृत्यूस कारणीभूत असलेल्याची चौकशी करून योग्य ती कारवाही करून उपविभागीय कार्यालयाला कळावी असे पत्र पोलीस निरीक्षक कन्नड व तहसीलदार कन्नड यांना काढले आहे यात नेमकी काय होणार सर्व तालुक्याचे लक्ष लागलेल आहे मिळणार का एक निष्पाप मुलीला न्याय. इतके दिवस उलटुन ही तपास यंत्रना मात्र संत गतीने दिसुन येत असल्याने तालुक्यात खलबते सुरू आहे नेमक काय सुरू आहे असाही प्रश्न पडला आहे. खरच श्रध्दाला न्याय मिळणार का? दोषीवर कठोर कारवाही व दंडात्मक कारवाई होणार का? असे प्रश्न उभे ठाकले आहे आता वेळच ठरणार यात होणार काय?





# लासूर, सावंगीत ढगफुटीमुळे जलतांडव

## दवाखान्यातील डॉक्टर, औषधालय, रुग्णाच्या वॉर्डात गुढघ्याएवढे साचले पाणी प्रसूतीसाठी आलेल्या महिलांचे हाल, शेतकऱ्यांची पिके झाली आडवे, विहिरी ढासळल्या, नागरिकांच्या घरात फुटले पाझर

आधुनिक केसरी न्यूज

**गुलाब वाघ**

**गंगापूर :** तालुक्यातील लासूर स्टेशन, सावंगी परिसरात ढगफुटी सदृश्य पाऊस झाल्याने लासूर स्टेशन येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात अक्षरशः तळे साचले असून इमारतीचा काही ठिकाणी स्लॅबही कोसळला असून इमारतीमधील वैद्यकीय अधिकाऱ्यांचे केबिन,रुगणांचे वॉर्ड, औषधालय, स्टोअर रूममध्ये गुडघ्या एवढे पाणी साचून तळे साचले असून रुग्णांची हेळसांड होत आहे. विविध लोकप्रतिनिधिनी आतापर्यंत ग्रामीण रुग्णालया व नवीन इमारतीच्या मंजुरीसाठी शासनदरबारीं निवेदने दिली असून आ. प्रशांत बंब, आ. सतीश चव्हाण मा. जिल्हा परिषद अद्यक्ष देवयानी पाटील डोणगावकर यांनीही ग्रामीण रुग्णालयाच्या मंजुरीसाठी जीवाचा आटापिटा केला. मात्र अद्यापही राजकीय उदासीनतेमुळे ग्रामीण रुग्णालय मंजुरीच्या प्रतीक्षेत आहे मात्र दवाखान्यात पाणी घुसल्याने रुग्णाचे अतोनात हाल होत आहे अशी माहिती यावेळी डॉ. बापूसाहेब चाटे, डॉ. स्नेहल सूर्यवंशी ,डॉ.तहशीन शेख यांनी दिली असून यावेळी आरोग्य सहाय्यीका चव्हाण सिस्टर, आरोग्य साह्यक बमनावत शेजुळ, आरोग्य सेविका श्रीमती पवार सिस्टर आरोग्य सेवक अविनाश म्हस्के शरद पवार, लहाने, जाधव, जंगले इ .कर्मचारी उपस्थित होते. सावंगी, बाजारतळ, बसस्थानक, अनेक नागरिकांच्या घरात पाणी घुसून नुकसान झाली असून संसार उघड्यावर पडले असून सावंगी चौकातील बाजार समितीसमोर पाणी साचून नैसर्गिक प्रवाह दाबल्याने घरात पाणी साचले आहे.

# कन्नड तालुक्यात परतीच्या पावसाने बळीराजा हवालदिल !

## हातातोंडाशी आलेले पीक गेले पाण्यात वाहून : रबी हंगामही लांबणीवर पडण्याची शक्यता









आधुनिक केसरी न्यूज

**सय्यद आरेफ**

**पिशोर :** दिवाळीचा सण तोंडावर आला असून शेतात पिके उभी असताना परतीचा पाऊस थांबण्याचे नाव घेत  नसल्याने रब्बी हंगाम लांबविनार असल्याने शेतकरी वर्ग हवालदिल झाला आहे. कन्नड तालुक्यात गेल्या दोन महिन्यांत झालेल्या पावसामुळे अनेक ठिकाणच्या जमिनीतील अद्यापही झाला नाही. त्यामुळे खरिपाची पिके अजूनही शेतातच पडून आहेत. पावसाने जमिनीत मोठ्या प्रमाणात तण उगवल्यामुळे रब्बीच्या पेरणीला विलंब होत आहे. खरिपाचे उत्पन्न अद्यापही हाती आलेले नाही. त्यामुळे तण काढणे, पेरणीसाठी बियाणे व खतांसाठी पैशांची जुळवाजुळव करण्याचे संकट शेतकऱ्यांसमोर आहे. तालुक्यात ऑगस्ट ते सप्टेंबर महिन्यात सर्वदूर जोरदार पाऊस झाल्यामुळे तसेच ऑक्टोबरमध्ये ऐन दिवाळी सणाच्या तोंडावर परतीच्या पाऊस तडाखा देत असल्याने खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. सोयाबीन, मका, कापूस , कांदा या पिकांमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी, तुंबत असल्याचे चित्र सद्याला पहावयास मिळत आहे, परिसर शेतात पानी की पानी शेतात ही परिस्थिती झाली आहे, मळमळ महेनत घेऊन उभारलेले पिक एन काढणीच्या वेळात हातातून जात असल्याचे शेतकऱ्यांवर कर्जाचे डोंगर उभरत असल्याची माहिती मिळत आहे, परिसरात अनेक शेतकरयांनी पेरणी करीत उदार-उसनवार, तसेच सावकारांकडून कर्ज काढले आहे, मात्र शेतीचा माल तर पाण्यात गेला घेतलेला कर्ज कशाच्या भवश्यावर फेडावे ?



हा प्रश्न शेतकरयांना सतवत आहे, परिसरात तत्काळ पंचमामें करून नुकसानभरपाई द्यावी अशी मागणी होत आहे रब्बीतील हरबरा, गहू, कांद्याचे क्षेत्र वाढणाऱ्या सप्टेंबर, ऑक्टोबर महिन्यात सतत पडणाऱ्या पावसाने शेतकऱ्यांच्या खरीप हंगाम उत्पादनात घट होण्याची मजली भव्य शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना सरसकट नुकसानभरपाई देण्याची मागणी करण्यात येत आहे सतत पडणाऱ्या पावसाने कपाशीच्या वाती झाल्या आहेत. पिकामध्ये पाणी साचले आहे.. अनेक ठिकाणी पाण्यात उभे असलेल्या पिकाची काढणी रखडली आहे. पाणी साचलेल्या चिखलातून भुईमूग, कापस वेचणी सोयाबीनमधील तण काढण्यासाठी मजुरांचा खर्च वाढला सध्या काही शेतकऱ्यांच्या जमिनीतील वाफसा झाला असून, तण काढण्यासाठी त्यांची धडपड सुरू आहे. बहुतांश शेतकऱ्यांचा कल तण नाशकाची फवारणी करण्याकडे आहे.

**बेकामी तणामुळे अंतरमशागत खर्च वाढला..!**

परतिच्या पाउसामुळे फायदा तर झाला नाही मात्र मोठ्या प्रमानात नुकसान झाल्याचे सदृश दिसत आहे त्यातच बेकामी तन काढन्यासाठीही एकरी एक हजार रुपयांपेक्षा अधिक खर्च करावा लागत आहे. ट्रॅक्टरने मशागत करून तण काढण्याचा काही शेतकरी प्रयत्न करत आहेत. मात्र , त्यासाठी ट्रॅक्टरचे एकरी भाडे, शिवाय तण वेचणीसाठी मजुरांचा खर्च वाढत आहे. त्यामुळे यंदा रब्बीची पेरणी लांबणीवर जाण्याची शक्यता आहे. बहुतांश शेतकऱ्यांचा कल कांदा लागवड, गहू, हरभरा, पेरणीकडे आहे. रब्बींच्या क्षेत्रात वाढ होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मक्याचे पीक काढून ते वाळण्यासाठी पसरविण्याचे काम सुरू आहे. रब्बीची पेरणी करण्यासाठी शेतकऱ्यांची धडपड असली तरी जमिनीचा वाफसा होण्याची त्यांना प्रतीक्षा करावी लागत आहे. वाफसा झाल्यानंतर तण काढून पेरणी करावी लागणार आहे. या गावात मोठ्या प्रमानात नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती. कन्नड तालुक्यात माहित चार पांच दिवसा पासून सूरु असलेल्या जोरदार पाउसाने शेतकरयांचे चांगले दमदार नुकसान केल्याचे चित्र पहावयास मिळत आहे,तालुक्यातील, भिलदरी, नाचनवेल, आड़गांव, सारोला, आमदाबाद, मोहाड़ी, जवखेड़ा,परिसरात धुव्वाधार पाऊस आल्याने शेतकरयांची आतून आता मोठ्या प्रमानात नुकसान झाल्याचे कळत आहे. पावसामुळे पिके पाण्याखाली गेल्याने किती शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. त्यामुळे बळीराजा आर्थिक संकटात सापडला आहे, शेतकऱ्यांनी पेरणी साठी बी- बियाणे कसे तरी आणून आशे पोटी लागवड केली, सध्याच्या स्थितिला शेतात  आलेला माल हातात आल्यासारखे होते, जोरदार पावसाच्या झटक्याने आता शेतकरीचे पूर्ण पिके कापूस मक्का, सोयाबीन, तूर, अद्रक उडीद, मूग पूर्ण पाण्याखाली गेल्यामुळे शेतकऱ्यांचे प्रमाणाच्या वर नुकसान झाल्याचे दिसत आहे, शेतकरी राजाने आता दिवाळीचे सण कसे साजरे करावे हे खूप मोठा प्रश्न? शेतकरी समोर आलेला आहे. पेरणी साठी दुकानदारांचे बी बियाण्याचे पैसे कसे द्यावे? शेतकरी राजाला शासनाने हातभार लावून त्यांना तात्काळ मदत जाहीर करून द्यावी परतीच्या पावसामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना तात्काळ नुकसान भरपाई द्यावी असे मागणी, सचिन सिंगल जमील शहा, कल्याण वैष्णव,चंपालाल राजपूत, भगवान राजपूत, नेपाल सिंगल, कपूर महेर, हनुमान वैष्णव, दिलीप राजपूत, किरण राजपूत, गोकुळ राजपूत, मदन राजपूत, शिकंदर शहा, अकबर शहा, उस्मान शाह, काकासाहेब चौतमल, एकनाथ चौतमल, विजय वैष्णव, जितेंद्र वैष्णव आदि गांवकर्यांनी केली आहे.

**कृषि अधिकारी काय म्हणतात..**

पावसाची तीव्रता बघता शेतकऱ्यांनी पिकांची झटपट काढणी करावी, तालुक्यातील शेतकऱ्यांनी काढणीला आलेल्या पिकांची लवकरात लवकर तोडणी करून घ्यावी आणि विविध काढणी केलेल्या पिकांची योग्य ठिकाणी साठवण करून ठेवावी जेणेकरून काढलेल्या पिकांना पाणी लागणार नाही . त्या सोबतच पानी साचनार नाही अशा ठिकाणी पिकांची ढेर करावे, जेने करून नुकसान होणार नाही व पिकाची नासाडी थाबेल, तालुक्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदती मिळवून देण्यासाठी तालुका कृषी अधिकारी कार्यालयाकडून वरिष्ठ कार्यालयात माहिती पाठविण्यात आली आहे, या करिता कृषि विभाग तत्पर आहे, तसेच वस्तुनिष्ठ पंचनामे करण्याचे काम चालू आहे, तालुक्यातील नुकसान ग्रस्त पूर्ण भागाचे पंचमाने टप्या तप्यात करण्यात येईल .

**बाळराजे मुळीक, तालुका कृषी अधिकारी, कन्नड**

# रेंगाळलेल्या अंबाजोगाई तलाठी सज्जाचा प्रश्न मिटला : परंतु शून्य अनुभवाचा तलाठी भेटला

आधुनिक केसरी न्यूज

**सुनिल सिरसाट**

**अंबाजोगाई :** गेल्या वर्षभरापासून अंबाजोगाई तलाठी सज्जाला केवळ राजकीय अट्टाहासपाई कायमस्वरूपी स्थायी तलाठी नाहीये. त्यामुळे तालुक्यातील शेतकऱ्यांचे, सर्वसामान्यांचे महसूल संबंधित प्रश्न आजतागायत प्रलंबित असून खूप मोठ्या प्रमाणात या सज्जाचा खातेदार अडचणीत आलेला असून सुरुवातीला महसूल अधिकाऱ्यांच्या नावाने ओरडणारा अडगळीत आलेला वर्ग आता मात्र गेल्या तीन-चार महिन्यांपासून राजकीय पुढाऱ्यांच्या नावाने आरडाओरडा करत असून एकतर कोणी या सज्जाचा पदभार घ्यायला तयार नाही. त्याचे कारण अद्याप पर्यंत कळलेले नाही. कसाबशा विनवण्या करून कुणाला पदभार घ्यायला लावला. तर त्याला काही ठराविक राजकीय पुढाऱ्यांचा विरोध होतो. तर माझ्या घरात आमदारकी आहे आम्हीच मतदारसंघाचे हक्काचे आणि कुंकाचे मालक आहोत. तेंव्हा मला तमका तलाठी मान्य नसून आमकाच पाहिजे असा अट्टाहास सामाजिक कार्यकर्ते तथा भाजपा ज्येष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा यांचा अट्टाहास असल्याने या राजकीय कुरघोडीत महसूल प्रशासनाची मात्र चांगलीच तारांबळ उडत असल्याने सातत्याने या मोठ्या सज्जात अडचणी येऊ लागल्याने विभागीय आयुक्तांनी अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या प्रश्नात वैयक्तिक लक्ष घालून सज्जा चार ठिकाणी विभागणी करून मोठा भार कमी करून दिला खरा, परंतु त्यानंतर तरी आता अडचण निर्माण होणार नाही असे वाटत असताना पुन्हा पहिले पाढे पंचावन्न....! असीच काहीशी परिस्थिती निर्माण झाली. . . . . . . खाऊन त्या खालची मातीही खाण्याची सवय अंबाजोगाई सज्जात काम करताना लागलेल्या काही बोटावर मोजण्या ईतपत तलाठ्यांनी चुकीची प्रथा पाडून ठेवल्याने अलीकडे नेमणूक केलेल्या




अरबाड नामक तलाठ्यालाही लाच स्वरूपात घबाड घेताना लाचलुचपत विभागाने कारवाई केली आणि पुन्हा तलाठ्यावाचून अंबाजोगाई सज्जा बंद पडला आणि नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीमुळे व दिवाळीच्या काळात विविध कामांसाठी आवश्यक कागदपत्रे मिळण्याच्या आशा-अकांक्षांचाही फज्जा उडाल्याने पुन्हा हा सज्जा छोटा होऊनही कामे प्रलंबितच......! त्यामुळे या ना त्या कारणाने घरघर लागलेल्या या सज्ज्याला कसाबसा काल-परवा तलाठी देण्यात आला खरा, परंतु त्या व्यक्तीला स्वतंत्ररित्या तलाठी म्हणून काम करण्याचा शून्य अनुभव असल्याने आणि अंबाजोगाई तालुक्यातील अंबाजोगाई तलाठी सज्जा हा अत्यंत महत्त्वपूर्ण असल्याने त्या अंतर्गत अनेक महसूल संबंधित प्रकरणे न्यायप्रविष्ठ व तक्रारीत असल्याने आता या शून्य अनुभवी तलाठ्याच्या माध्यमातून काय व कसे कामे होणार....? हा प्रश्न या निमित्ताने निर्माण झाला आहे.

**उपजिल्हाधिकारी शरद झाडके यांच्या निर्णयावर प्रश्नचिन्ह उपस्थित**

उपजिल्हाधिकारी शरद झाडके यांच्या कार्यालयात त्यांच्या हाताखाली काम केलेल्या आपल्या मर्जीतीलच अनुभव शून्य व्यक्ती तलाठी म्हणून देण्यामागे नेमके काय गौडबंगाल आहे.?? अशी कुजबुजही उपजिल्हाधिकारी शरद झाडके यांना संबोधुन तालुकाभर सुरू असून त्यांच्या तलाठी नेमणुकीबाबत वारंवार जातीवाद करतात असाही आरोप काही महसूल संबंधित कर्मचा-यांनी नाव न छापण्याच्या अटीवर आमच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले. महसूल अधिकारी आणि राजकीय पुढारी यांच्या जातीवादात तथा हेव्यादाव्यात आणि आट्टाहासात सर्वसामान्य आणि धनदांडगा आंबेजोगाईकर मात्र चांगलाच भरडला जात असून वैतागलेला नागरिक " आता अंबाजोगाई तलाठी सध्याची काळजी देवालाच काळजी असे..! " असे उपहासात्मक अनुद्गार अपसुकच कानी पडत आहेत. तेंव्हा अधिकारी असो की पुढारी दोन्ही जनतेचे नौकर.., मग जनतेच्या जीवावर यांची घरे चालतात. हे दिवसेंदिवस स्वत:ची पोळी भाजून मोठे होतात. मग मोठे होताना तथा झाल्यावर ज्यांच्या जीवावर ही अनपेक्षित कायापालट होते आहे, झाली आहे. त्या मायबाप जनतेचा यांना विसर कसा काय पडू शकतो.?? तेंव्हा आता नवनियुक्त तलाठी संतोष चव्हाण कशा पद्धतीने अधिकारी-पुढारी आणि जनतेचा मेळ बसवत काम करतात हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल.!!



## लासूर स्टेशनला तुफानी वाऱ्यासह पाऊस

### पिके आडवी तर विहीर ढासळली पत्रे उडाले

आधुनिक केसरी न्यूज

**लासूर स्टेशन :** (ता.गंगापूर) परिसरात गुरुवारी (ता.20) सकाळी आठच्या सुमारात झालेल्या मुसळधार पावसाने मका, कपाशी आडवी झाली.शेतात सर्वत्र पाणीच पाणी तर अनंतपूर शिवारातील एक विहीर पूर्णपणे खचली. सिमेंट कड्यासह सर्व गडप केलेल्या या विहिरीत विज पडल्याचा अंदाज शेतकऱ्यांनी व्यक्त केला. लासूर स्टेशनच्या अनंतपूर शिवारात शेतकऱ्यांचे खूप नुकसान झाले. वादळी वाऱ्यासह विजेच्या कडकडाटात तासाभरात झालेल्या पावसाने मका, कपाशी पिक भुईसपाट केली.शेतात गुडघाभर पाणी साचल्याने आडवी झालेली पिक सडतील अशी अवस्था झाली. वादळी वाऱ्याने घरावरील पत्रे उडाली तर अनंतपूर शिवारातील डॉ. विकास संगेकर, अविनाश संगेकर यांच्या शेतातील सिमेंट कडे उभारून बांधलेली विहीर पूर्णपणे खचली.या विहिरीने विटांच्या बांधकामावर असलेले सिमेंटचे कडे सुद्धा गिळंकृत केले. बहुदा या विहिरीवर विज पडली असावी असा अंदाज व्यक्त केला जात आहे.या पावसाने अक्षरशः दणादण उडाली तर लासूरगाव रस्त्यावर पाणीच पाणी होते अवघा रस्ताच पाण्यात होता. यंदाच्या पावसाळ्यातील हा सर्वात मोठा पाऊस होता असे शेतकऱ्यांनी सांगितले. शासनाने त्वरित नुकसानभरपाई द्यावी अशी मागणी शेतकरी करत आहेत.

## 49 वर्षानंतर मिळाले आगरनांदूर पुनर्वसित गावाला सरपंचपद

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** तालुक्यातील आगरनांदुर ग्रामपंचायतीच्या सरपंच पदी संजय केशवराव थोरात तर जालीदंर शांतवन गायकवाड उपसरपंचपदी यांची बिनविरोध निवड करण्यात आली, 1973 साली पुनर्वसन झालेल्या धरणग्रस्त आगरनांदुरला 49 वर्षानंतर पहीली ग्रामपंचायत स्थापन झाली. त्या पहील्या ग्रामपंचायतचा मान संजय केशवराव थोरात यांना मिळाला यांची बिनविरोध निवड जाहीर होताच समर्थकांनी फटाके व गुलाल उधळत आपला आनंद साजरा केला. पूर्वी हे गाव आपेगाव ग्रामपंचायतमधे होते मात्र लोकसंख्याच्या निकसाप्रमाणे आता स्वतंत्र ग्रामपंचायत झाली.



## लासूरला उपसभापती तथा उपसरपंच संपत छाजेड यांचा गावकऱ्यांच्या वतीने जाहीर नागरी सत्कार






आधुनिक केसरी न्यूज

**गंगापूर :** तालुक्यातील लासूर स्टेशन ग्रुप ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या दायगाव येथील बोरकर वस्ती ते दायगांव पाणंद रस्त्याचे मजबुती करणाचे काम उपसरपंच तथा गंगापूर पंचायत समितीचे उपसभापती संपत छाजेड यानी 25/15 योजनेतून पूर्ण करून दिल्याबद्दल संपत छाजेड यांचा गावाकऱ्यांच्या वतीने छोटेखानी नागरी सत्कार करून आभार पत्र देत करण्यात आला. यावेळी उपस्थित बोरकर वस्तीतील नागरिक व ग्रामपंचायत सदस्य अमोल शिरसाट नारायण ठोळे, संतोष पाटील जाधव, कल्याण बोरकर आदी गावकरी, मान्यवर उपस्थित होते.

## केंद्रीय युवक महोत्सवात आम्रपालीने पटकावला तृतीय क्रमांक

आधुनिक केसरी न्यूज

**लासूर स्टेशन :** डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नुकत्याच झालेल्या केंद्रिय युवक महोत्सवामध्ये मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, छत्रपती शाहू कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय लासूर स्टेशन येथील बी.एस्सी द्वितीय वर्षाची विद्यार्थीनी कु. आम्रपाली भाऊसाहेब रणयेवले हिने काव्यवाचन या कलाप्रकारात तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळवले ; त्याबद्दल महाविद्यालयाच्यावतीने आम्रपाली हिचा सत्कार करण्यात आला. यावेळी महाविद्यालय विकास समितीचे अद्यक्ष शेषराव जाधव, सदस्य गुलाब वाघ, संदीप आढाव, पत्रकार सलीम शहा, प्राचार्य साहेबराव नाईकवाडे, प्रा. मधुकर साठे, प्रा. दिपक जाधव, प्रा. शिवप्रसाद घोडके आदिसह शिक्षक महोदयांची उपस्थिती होती.



# ‘दिवाळी पहाट’ची सुरेल मेजवानी

## दै. मराठवाडा साथी, बंसल क्लासेस, श्री माहेश्वरी मंडळाकडून आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** एरवी वर्षभर शास्त्रीय संगीताच्या मैफिली किंवा मराठी हिंदी गीतांचे कार्यक्रम होत असले तरी गेल्या अनेक वर्षांत लखलखत्या दिवाळीचा उत्साह द्विगुणीत करणारा कार्यक्रम म्हणजे दिवाळी पहाट.. गुलाबी थंडीत पहाटेच्या या सांगीतिक फराळाचा आस्वाद रसिकांना देण्यासाठी यंदा शहरात दैनिक मराठवाडा साथी प्रस्तुत आणि बंसल क्लासेस व श्री माहेश्वरी मंडळ, महेशनगर प्रभाग आयोजित तसेच राजस्थानी मल्टीस्टेटच्या सहयोगाने ‘दिवाळी पहाट गाणी’ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सुप्रसिद्ध गायिका संगिता भावसार यांच्या सुरेल स्वरांनी औरंगाबादकरांची दिवाळी पहाट रंगणार आहे. हा कार्यक्रम २२ ऑक्टोबर म्हणजेच धनत्रयोदशी दिवशी पहाटे साडेपाच वाजता निराला बाजार भागातील तापडिया नाट्यमंदिरात होणार आहे. दिवाळी आणि पहाट गाणी हे औरंगाबादकरांसाठी कायमच जिव्हाळ्याचा कार्यक्रम ठरला आहे.

दैनिक ‘मराठवाडा साथी’चे संस्थापक संपादक स्व. मोहनलालजी बियाणी यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्य संपादक चंदुलाल बियाणी हे गेल्या ४० वर्षांपासून परळी वै. येथे ‘दिवाळी पहाट’ हा दर्जेदार कार्यक्रम अविरतपणे घेत आहेत. त्याचप्रमाणे संपादक जगदीश बियाणी आणि जिल्हा माहेश्वरी वरिष्ठ संघटनेच्या



अध्यक्षा सौ. शोभा बागला यांच्या संकल्पनेतून २०१३ साली सर्वप्रथम औरंगाबाद शहरात दिवाळी पहाट गाणी कार्यक्रम आयोजित करून शहरवासीयांची दिवाळी सुरेल केली होती. तेव्हापासून दरवर्षी दिवाळी पहाट कार्यक्रम औरंगाबाद येथे घेण्यात येतो. मध्यंतरी कोरोनामुळे सर्वांचीच दिवाळी घरातच साजरी झाली. मात्र यंदाची दिवाळी देखील अशीच सुरेल संगीत मैफलीने रंगणार आहे. सुप्रसिद्ध गायिका संगीता भावसार यांच्या सुमधुर सुरांनी दिवाळीची सुरुवात होणार आहे. संगीता भावसार यांनी हृदयनाथ मंगेशकर, सुरेश वाडकर, उषा मंगेशकर, उत्तरा केळकर, चंद्रशेखर गाडगीळ, वैशाली सामंत, अवधूत गुप्ते, वैशाली माडे अशा दिग्गज गायकांसोबत मंचावर गायन केले आहे. लोकप्रिय असलेली पहाटेची भक्तिगीते, जुने, नवे मराठी व हिंदी अवीट गोडीची गाणी. सोबतच कानाला तृप्त करणारं सुश्राव्य संगीत अशी रंगतदार दिवाळीची सुरुवात यंदा होणार आहे. संगीता भावसार यांना साथसंगत करणार आहेत गायक नीरज वैद्य, संदीप डोलाहारकर आणि वाद्य पथकात संगीतराजचे राजेश भावसार, राजू जगधने, अभिजित शिंदे, गोपाल खोमणे, आणि विजय खंडागळे. या दिवाळी पहाट कार्यक्रमाचे सूत्रसंचलन नीता पानसरे या करणार आहेत. हा कार्यक्रम दैनिक मराठवाडा साथीने प्रस्तुत केला असून बंसल क्लासेस आणि श्री माहेश्वरी मंडळ,महेश नगर प्रभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आणि राजस्थानी मल्टीस्टेटच्या सहकार्याने दिवाळी पहाट कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमासाठी शिवसेना नेते चंद्रकांत खैरे यांचे विशेष सहकार्य लाभले आहे. शनिवार २२ ऑक्टोबर रोजी पहाटे साडेपाच वाजता निराला बाजार येथील तापडिया नाट्यमंदिरात होणाऱ्या या दिवाळी पहाट कार्यक्रमाचा औरंगाबादकरांनी लाभ घ्यावा असे आवाहन दैनिक मराठवाडा साथी, बंसल क्लासेस, राजस्थानी मल्टीस्टेट, श्री माहेश्वरी मंडळ, महेश नगर प्रभाग प्रमुख सुनील खटोड, सचिव डॉ. बिपीन जेथलिया, प्रकल्प प्रमुख सौ. शोभा बागला, सौ. सुनीता बियाणी यांच्यासह सर्व कार्यकारणी आणि सदस्य श्री माहेश्वरी मंडळ, महेश नगर प्रभाग यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# आरसीएफ थळ दुर्घटनेत आणखी एकाचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**अलिबाग :** आरसीएफ कंपनीच्या थळ प्रकल्पात झालेल्या स्फोट दुर्घटनेतील मृतांची संख्या चारवर पोहोचली आहे. दुर्घटनेतील जखमी साजिद सिद्दीकी याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. दरम्यान कंपनी व्यवस्थापनाने मृतांच्या वारसांना प्रत्येकी पाच लाखांची तर जखमींना तीन लाखांची तातडीची मदत व उपचार खर्च देण्याचा निर्णय घेतला आहे. बुधवारी संध्याकाळी पाचच्या सुमारास ही दुर्घटना घडली होती. कंपनीच्या बाष्प निर्मिती संयत्र नियंत्रण कक्षात वातानुकूलन यंत्रणा बसविण्याचे काम सुरु होते. यावेळी अचानक स्फोट झाला. या दुर्घटनेत तीन जणांचा जागीच मृत्यू झाला होता. तर तीन जण गंभीर जखमी झाले होते. या तिघांना उपचारासाठी नवीमुंबईतील फोर्टीस रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. यातील साजिद सिद्दीकी यांचा गुरुवारी उपचारादरम्यान मृत्यू झाला. अपघातात त्याच्या डोक्याला गंभीर दुघापत झाली होती. अन्य दोन जखमींची प्रकृती स्थिर असून त्यांच्यावर उपचार सुरु आहेत. दरम्यान या संपुर्ण दुर्घटनेच्या कारणांचा शोध घेण्यासाठी उच्चस्तरीय तज्ञ सदस्यांची चौकशी समिती गठीत करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी महेंद्र कल्याणकर, फँक्ट्री इंस्पेक्टर, महाराष्ट्र प्रदूषण नियामक मंडळाच्या सदस्यांनी दुर्घटना स्थळाची पहाणी केली आहे. दुर्घटनेनंतर कंपनीतील सर्व संयत्रांचे प्रचलन सुस्थितीत सुरु आहे अशी माहिती कंपनीचे मुख्य महाव्यवस्थापक श्रीनिवास कुलकर्णी यांनी दिली आहे.






# फर्दापूर येथे हरवलेले दोन मोबाईल परत दिले मिळवून

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** फर्दापूर येथील मोबाईल हरवला किंवा चोरी झाला अशा बऱ्याच तक्रार पोलीस स्टेशन फर्दापूर यांना प्राप्त झालेल्या होत्या. आपण आधुनिक डिजीटल युगात वावरताना किंवा समाजमाध्यमांचा वापर करताना सतर्क राहणे गरजेचे आहे, असे आपण योग्य ती सर्तकता न बाळगल्यास भामटे आपल्या अज्ञानाचा गैरफायदा घेवून आर्थिक, वैयक्तिक नुकसान करू शकतात. अशीच एक रोजी फर्दापूर येथील तक्रारदार यांनी पोस्टे सायबरवर येथे संपर्क करून माहिती दिली मोबाईल हरवला म्हणून गुन्हयाचे तपासात पोलीस अधीक्षक औरंगाबाद वरिष्ठांचे मार्गदर्शनावरून सपोनि देविदास वाघमोडे फर्दापूर पोलीस स्टेशन यांनी मोबाईलचा शोधाशोध करून दोन मोबाईल परत करण्यात आले. जिल्ह्यातील पोलीस स्टेशनने नागरिकांचे २७ मोबाईल हँण्डसेट ज्याची किमंत अंदाजे ३,९६,५१६ रुपये किंमतीचे मोबाईल नागरिकांना परत करण्यात आले. त्यांचा हरवलेला मोबाईल परत मिळालेला पाहून त्यांनी आनंद व्यक्त केला. अशा बऱ्याच गुन्हातील घटनेचे शोध फर्दापूर पोलीस स्टेशनने लावलेले आहे. त्या अनुषंगाने पोलीस अधीक्षक कार्यालय येथे जाऊन सपोनि देविदास वाघमोडे व तक्रारदार यांना सोबत घेऊन औरंगाबाद कार्यालयात दोन मोबाईल पोलीस अधीक्षक मनीष कालवनिया साहेब यांच्या हस्ते परत करण्यात आले.

# ऑनलाईन फसवणूक करणाऱ्यास सुरत येथून अटक; औरंगाबाद पोलिसांची धडाकेबाज कारवाई

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** औरंगाबाद आधुनिक डिजीटल युगात वावरतांना किंवा समाजमाध्यमांचा वापर करतांना सतर्क राहणे गरजेचे आहे. आपण योग्य ती सर्तकता न बाळगल्यास अज्ञात भामटे आपल्या अज्ञानाचा गैरफायदा घेवून आपले आर्थिक, वैयक्तिक नुकसान करू शकतात. अशे दिनांक ०६/०८/२०२२ रोजी कवड येथील तक्रारदार यांनी पोस्टे सायवर येथे संपर्क करून माहिती दिली की, त्यांचे मुलास अज्ञात इन्स्टाग्राम खात्याचा वापरकर्ता याने क्रिप्टो ट्रेडिंग करून अर्ध्या तासात पैसे डबल करून देतो अशा थाप मारून ७१०८०/- रूपयांचा भरणा करून घेवून फसवणूक केली आहे. यावरून पोस्टे सायबर येथे गुरनं ३७/२०२२ कलम ४२० भादवीसह कलम ६६) आयटी ॲक्ट अन्वये गुन्हा दाखल केला. नमूद गुन्हयाचे तांत्रिक तपासात गुन्हयात वापरलेले इन्स्टाग्राम खात्यांची माहिती हस्तगत करून नमूद गुन्हयातील आरोपी हे सुरत राज्य गुजरात येथील असल्याचे निष्पन केले. तसेच नमूद गुन्हयाचे तपासात मा. वरिष्ठांचे मार्गदर्शनावरून सुरत येथे जावून तांत्रिक माहिती आधारे आरोपीस निष्पन्न करून मोठ्या शिताफीने आरोपीना सप्पद महंमद उस मियाँ हाफीज वय ३० वर्ष व्यवसाय व्यापार (जुने मोबाईल खरेदी विक्री) रा. १०. अलकुरेशी अपार्टमेंट, नानपुरा मार्केट, सुरत राज्य गुजरात यास ताब्यात घेतले. पैसे कमविण्यासाठी त्यांनी क्रिप्टो ट्रेडिंगचे नावाने इन्स्टाग्राम खाते तयार केले, तसेच नमूद खात्यावर जे जे लोक गुंतवणूकीसाठी त्यांना मेसेज करत ते त्यांना अर्ध्या तासात तुमचे पैसे करून देतो असे सांगून पैशांचा भरणा करून घेत, याप्रकारे त्यांनी बराच लोकांची फसवणूक केली असल्याचे सांगितले आहे. नमूद आरोपीने आणखी कोणाकोणाची अशा प्रकारे पासवणूक केली आहे. याबाबत पोलीस तपास सुरू असून नमूद आरोपीस मा. न्यायालयाने दोन दिवसांचा पीसीआर मंजूर केला असून गुन्हयाचा अधिक तपास सुरू आहे. कुठलीही गुंतवणूक करण्यापूर्वी अगोदर खात्री करा. असे प्रकार आढळून आल्यास तात्काळ सायबर पोलीस ठाणे औरंगाबाद ग्रामीण येथे संपर्क साधावा असे आवाहन अधिक्षक मा. मनिष कलवानिया, पोलीस अधिक्षक, औरंगाबाद ग्रामीण यांनी केले आहे. नमूद कामकाज मा. मनिष कलवानिया, पोलीस अधिक्षक औरंगाबाद ग्रामीण, डॉ. पवन बन्सोड, अपर पोलीस अधिक्षक, औरंगाबाद ग्रामीण यांचे मार्गदर्शनानुसार अशोक पुगे, पोनि सायबर, प्रविण पाटील, भारत माने पोउपनि पोह/कैलास कामठे, संदिप वरपे, नितिन व रविंद्र लोखंडे, सविता जायभाये, योगेश दारवंटे, शितल खंडागळे सायबर पोलीस ठाणे औरंगाबाद ग्रामीण यांनी केले आहे. अशी माहिती छायाचित्रकार तथा अध्यक्ष मच्छिंद्र नागरे यांनी लोकशाहीचे सहसंपादक गोकुळसिंग राजपूत यांच्याशी बोलताना सांगितले.



# जि.प. उस्मानाबाद येथे संस्थांची बैठक

आधुनिक केसरी न्यूज

**उस्मानाबाद :** मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा. पं.) शाम गोडभरले यांच्या मार्गदर्शनाखाली सामाजिक संस्थाची बैठक संपन्न झाली. साहेबांनी शासन योजना, लोकसहभाग, प्रशासनाला पुरक भूमिकेसाठी संस्थांना समन्वयातून काम करण्यासाठी अवाहन केले. बैठकीला पिरामल फाउंडेशन निर्मित ‘संयुक्त संघटन’ मंचावर सक्रिय उस्मानाबाद जिल्ह्यातील ८ तालुक्यातील ५० संस्था उपस्थित होत्या. निती आयोगाच्या निर्देशंकानुसार शिक्षण, आरोग्य ,पाणी, उपजीविका, कृषी इ. सारख्या विषयावर, जिल्हा परिषद उस्मानाबाद सोबत काम करण्यास इच्छुक संस्थांचे मागील कामाचे अनुभव जाणून घेतले. बैठकीचे पूर्वनियोजन संचलन पिरामल फाऊंडेशनचे दिगंबर गांधले, अक्षय शिनगारे, नागेश पडघान, पंकजकुमार आणि आदित्य कुमार यांनी केले.

# बेस्ट कामगारांना ६ ते ११ हजार वेतनवाढ, आज बोनस मिळणार

## भाजपा बेस्ट कामगार संघाचे अध्यक्ष गणेश हाके यांची माहिती

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** भाजपा बेस्ट कामगार संघाच्या प्रयत्नामुळे बेस्ट कामगारांसाठीच्या वेतन करारावर नुकत्याच स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. या करारानुसार कामगारांना ६ हजार ५०० ते ११ हजार ५०० एवढी वेतनवाढ मिळणार असून दिवाळीचा बोनस २१ ऑक्टोबर रोजी कामगारांच्या खात्यात जमा होईल अशी माहिती भाजपा बेस्ट कामगार संघाचे अध्यक्ष गणेश हाके व सरचिटणीस गजानन नागे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे. या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे की, बेस्ट कामगारांसाठीचा २०१६ ते २१ चा करार नुकताच करण्यात आला असून त्यानुसार कामगारांना ६ हजार ५०० ते ११ हजार ५०० एवढी वेतनवाढ मिळणार आहे. तसेच सातव्या वेतन आयोगाच्या तरतुदीही बेस्ट कामगारांना लागू झाल्या आहेत. नव्या वेतनाची थकबाकी कामगारांना देण्यात येणार आहे. या करारावर कामगार संघातर्फे अध्यक्ष गणेश हाके, सरचिटणीस गजानन नागे तर बेस्ट प्रशासनातर्फे महाव्यवस्थापकलोकेश चंद्र, व्यवस्थापक रवींद्र शेट्टी यांनी स्वाक्षऱ्या केल्या. यावर्षीच्या दिवाळीसाठीचा बोनस शुक्रवार २१ ऑक्टोबर रोजी कामगारांच्या बँक खात्यात जमा करण्याचे बेस्ट प्रशासनाने मान्य केले, असेही हाके यांनी पत्रकात नमूद केले आहे.